# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:-९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ४६ | बुधवार,दि.१९ ऑक्टोबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# सहा जिल्हे आदिवासी विकास योजनेपासून वंचित

**गोंदिया:** देशात १९७१ मध्ये झालेल्या जनगणेत विदर्भातील गोंदिया,भंडारा,नागपूर,वर्धा,अकोला व बुलढाणा या सहा जिल्ह्यांत अनुसूचित क्षेत्रांची पुनर्रचना करण्यात आलेली नाही. ३७ वर्षानंतरही शासन,प्रशासनाने याबाबत दुरुस्ती वा सुधारणा केली नाही. त्यामुळे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पत्राद्वारे पेसा क्षेत्राची पुनर्रचना करावी, अशी मागणी ट्रायबल फोरमचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रमोद घोडाम यांनी केली आहे.

अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जनजाती यांचे प्रशासन व नियंत्रणबाबत भारतीय संविधानातील पाचव्या अनुसूचित तरतुदी आहेत.राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्यासाठी १९५० आणि १९६० साली अनुसूचित क्षेत्र घोषित केले होते.तेच अनुसूचित क्षेत्र पुन्हा दि.२ डिसेंबर १९८५ साली निश्चित करून घोषित केले. त्यामुळे पेसा क्षेत्रात वाढ झाली नसून याचा फटका विदर्भातील सहा जिल्ह्यांना बसला आहे.

सन २०११च्या जनगणेनुसार सद्यस्थितीत राज्यात एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये ४४ हजार १९९ गावे व शहरे आहेत.यात ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ एवढी एकूण लोकसंख्या असून, त्यापैकी १ कोटी ५ लाख १० हजार २१३ आदिवासी लोकसंख्या आहे. आदिवासींच्या लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येची टक्केवारी ९.३५ आहे. हे राज्यातील ३१ हजार ६३९ गावांत व शहरात आदिवासी लोकसंख्या आहे. यापैकी ६ हजार ७४१ गावे व शहरांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या आहे.

## जनगणनेत आदिवासींची नोंदच नाही

राज्यात १९८५ मध्ये अनुसूचित क्षेत्रातील गावे घोषित करण्यात आली. ती अधिसूचना सन १९७१ च्या जनगणनेतील माहितीवर आधारित होती. विदर्भातील आदिवासीबहुल गोंदिया, भंडारा,नागपूर,वर्धा,अकोला व बुलडाणा जिल्ह्यातील तालुक्यात आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असतानाही नसल्याचे दाखविण्यात आले. यामुळे विदर्भातील आदिवासींवर अन्याय झाला आहे. ३७ वर्षांपासून त्यांना त्यांच्या घटनात्मक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

## जिल्हा, तालुका निर्मितीमुळे सीमा रेषेत बदल

१९८५ नंतर राज्यात मुंबई उपनगर,नंदुरबार,वाशिम,हिंगोली,गोंदिया,पालघर या सहा जिल्ह्यांची निर्मिती झाली.नवीन जिल्ह्यांच्या निर्मिती मुळे अनेक नवीन तालुक्यांची निर्मिती व पुर्नरचना झाली. त्यामुळे त्यांच्या सीमा रेषेत बदल झालेला आहे. पर्यायाने अनुसूचित क्षेत्रात बदल होऊन पुनर्रचना होणे अपेक्षित होते. परंतु अद्यापही तसे झाले नाही. केंद्रातील जनजाती कार्य मंत्रालया कडून २६ मे २०१५ रोजी राज्यातील अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेच्या कामास चालना देण्याच्या सूचना आहेत. त्यामुळे पेसा कायद्यातील विविध तरतुदींचा विचार करुन आदिवासी विकासाची व्याप्ती वाढेल तसेच गती प्राप्त होईल. या दृष्टीने सर्वकष प्रस्ताव तयार केलेला आहे.शासनाने संधी उपलब्ध करुन दिल्यास प्रस्तावाचे सादरीकरण करू

**श्रीकांत धर्माळे**, सेवानिवृत्त उपायुक्त, पुणे

# निविदा न काढताच कोट्यवधींचे कंत्राट देण्याचा निर्णय

**गोंदिया:** शासन व महाज्योतीच्या नियमांप्रमाणे कुठलेही कंत्राट देताना निविदा काढणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्थेची निविदा मंजूर केली जाते. ती संस्था गुणवत्तेमध्ये त्या अटी व शर्ती पूर्ण करतात का? याचीही पडताळणी केली जाते. परंतु महाज्योतीच्या संचालक मंडळाची कोणतीही मंजूरी न घेता ओबीसी मंत्रालयातील अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार यांनी औरंगाबाद येथील एका खासगी संस्थेला प्रशिक्षणाबाबत सुमारे ५० कोटींचे नियमबाह्य कंत्राट देण्याचा शासन निर्णय काढला आहे. हा महाज्योतीला मोठा धक्का असून सध्या मंत्रालयातील अधिकाऱ्याकडून मोठे धुडघूस घातला जात असल्याने माजी संचालकांकडून रोष व्यक्त होत आहे.

या स्वायत असलेल्या महाज्योतीचे टेंडर व काढता, संचालक मंडळाची अनुमती नसताना अतिरिक्त मुख्य सचिवांनी परस्पर शासन निर्णय काढून शासनाच्या पारदर्शक प्रक्रियेचे वाभाडे काढले. शासन निर्णयातील अटी व शर्ती तसेच संबोधिनी या संस्थेला द्यायची रक्कम पाहता, हा शासन निर्णय संस्थेनेच तयार करुन शासनास प्रसिद्ध करण्यासाठी दिला असावा. विशेष म्हणजे हा शासन निर्णय कुणालाही माहीत होऊ नये म्हणून तो शासनाच्या संकेतस्थळावरुन टाकलेला नाही. अशासकीय संचालक नसताना पहिल्यांदा २६ सप्टेंबरला महाज्योतीची सभा ओबीसी मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तेव्हा हे प्रकरण संचालक मंडळाने मंजूर करावे, म्हणून खुद्द अतिरिक्त मुख्य सचिव नंदकुमार हे संबोधी संस्थेच्या अध्यक्षांसह नागपुरात बसले होते व संबोधीला बेकायदेशीरपणे सुमारे ५० कोटींचे कंत्राट मिळवून दिले. असेही आता महाज्योतीच्या हितचिंतकाकडून चर्चीले जात आहे.

याशिवाय एमपीएससी परीक्षेसाठी पुण्याच्या ज्ञानज्योती संस्थेलाही सुमारे १८ कोटींचा कंत्राट देतानाही मंत्रालयातील मंत्री व अधिकारी स्तरावरुन महाघोटाळा झाल्याचेही सांगितले जात आहे. कोरोनाकाळात महाज्योतीने ज्ञानदीप अकादमीला एमपीएससीसाठी प्रति विद्यार्थी ४५ हजार रुपये प्रमाणे निविदा काढून कंत्राट दिले होते. यावेळी सुद्धा कायद्यानुसार ६ टक्के वाढ करुन कंत्राट देण्याचा निर्णय महाज्योतीने घेतला होता. पण एमपीएससीच्या अभ्यासक्रमात बदल झाल्याने या रकमेत कंत्राट परवडणारे नसल्याने ज्ञानदीपने महाज्योतीला कळविल्यावर ते कंत्राट रद्द करुन नव्याने निविदा काढण्याचे ठरवून तशी प्रक्रियाही सुरु केली होती. पण, अचानक कोणतीही निविदा न काढता १५०० विद्यार्थ्यांकरिता १८ कोटींचे कंत्राट देण्यात आल्याचेही पुढे आले आहे. ही सर्व प्रक्रिया मंत्रालय स्तरावरुन झाल्याने याची चौकशी होण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार

महाज्योतीच्या नियमांना डावलून केवळ स्वहित जोपासत नियमबाह्यरित्या कोट्यावधींचे कंत्राट खासगी संस्थांना देण्याचा सपाटा लावला आहे. यामध्ये मंत्रालयातील मंत्री, अधिकारी आणि संबंधित संस्थेने चांगलाच धुडगूस घातला आहे. त्यामुळे ओबीसींकरिता असलेली महाज्योती अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाज्योतीसाठी केंद्र सरकारने कंपनी कायद्याखाली कॅगचे ऑडिटर नेमण्यात आलेले आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराविरुद्ध केंद्र सरकारच्या कॅग ऑडिटरकडे तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पुराव्यासह तक्रार करण्याची तयारी हितचिंतकाकडून सुरु झाली आहे. यासोबतच उच्च न्यायालयातही याचिका दाखल केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# रेल्वे उड्डाणपुलासह विविध समस्यांसाठी राकाँचा जनमोर्चा

## प्रशासनाला दिले मागण्यांचे निवेदन



**गोंदिया:** रेल्वे उड्डाणपुलाचे काम त्वरित सुरु करुन शहरातील विविध समस्यांना घेवून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १७ऑक्टोबर रोजी माजी आ. राजेंद्र जैन यांच्या नेतृत्वात जनमोर्चा, दुचाकी रॅली काढून शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले. दरम्यान मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व रेल्वे प्रशासनाला देण्यात आले.निवेदनानुसार, शहराला उत्तर-दक्षिण भागाला जोडणाऱ्या रेल्वे मार्गावरील उड्डाणपुलाचे काम त्वरित पूर्ण करावे, कुडवा लाईन परिसरातील पादचारी पूल सुरु करावा, शहरातील स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची नियमीत पुरवठा करावा, कोरोना काळात बंद केलेल्या

सर्व रेल्वेगाड्या पूर्ववत करव्यात, सिंगलटोली रेल्वे चौकीजवळ भूमिगत पूल तयार करावा, रेल्वेगाड्या आऊटरवर थांबवू नये, भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे दुदुर्शाझालेल्या रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, मोक्षधाम परिसरातील केरकचऱ्याची त्वरित विल्हेवाट लावण्यात यावी, प्रधानमंत्री शहरी घरकूल योजनेचे थकीत हप्ते त्वरित देण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. तसेच या समस्या त्वरित मागी न लावल्यास खा.प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला. जनमोर्चा व दुचाकी रॅलीमध्ये जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, विरेंद्र जायस्वाल, अशोक सहारे, चुन्नी बेंद्रे, आशा पाटील, प्रेम जायस्वाल, केतन तुरकर,रफिक खान, विशाल शेंडे, सतीश देशमुख , सुनील भालेराव, विनीत शहारे, हेमंत पंधरे, मनोहर वालदे, राजू एन.जैन,नानू मुदमुलियार, वेनेश्वर पंचबुद्धे,राजेश कापसे, खालिद पठाण, रवी मुदडा,माधुरी नासरे, सुशीला भालेराव, पुष्पलता माने, चंद्रकुमार चुटे, संजीव राय, सौरभ रोकडे,राजेश दवे, कुंदा दोनोडे, विनायक खैरे, दीपक कनोजे, शंकर सहारे, एकनाथ वहिले, अजय जायस्वाल, टी. एम. पटले, जिम्मी गुप्ता, लव माटे, दर्पण वानखेडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर कोसळून ७ जणांचा मृत्यू

**डेहरादून**-केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर कोसळले. यात ७ जणांचा मृत्यू झाला आहे.उत्तराखंडमधील केदारनाथपासून २ किमी अंतरावर असलेल्या गरुडचट्टी येथे हेलिकॉप्टरचा अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी हेलिकॉप्टरमध्ये ७ जण असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, अद्याप यासंदर्भात कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. हे हेलिकॉप्टर एका खासगी कंपनीचे असल्याचे सांगितले जात आहे. हेलिकॉप्टर संदर्भात अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर केदारनाथहून परतत होते. त्याचवेळी हा अपघात झाला. ज्या रस्त्यावर हा अपघात झाला तो केदारनाथ धामचा जुना मार्ग होता. अपघाताच्या वेळी हेलिकॉप्टरमध्ये सहा जण होते.मदत आणि बचावकार्यासाठी पथके रवाना झाली आहेत. केदारनाथमध्ये दाट धुके असल्याचे सांगण्यात येत आहे.

# न्या.चंद्रचूड ९ नोव्हेंबरपासून भारताचे सरन्यायाधीश



**नवी दिल्ली**- भारताच्या राष्ट्रपतींनी न्यायमूर्ती धनंजय वाय चंद्रचूड यांची ९ नोव्हेंबर २०२२ पासून भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. वर्तमान सरन्यायाधीश यू.यू.ललित यांच्या निवृत्तीनंतर न्यायमूर्ती चंद्रचूड हे भारताचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. ११ ऑक्टोबर रोजी वर्तमान सरन्यायाधीश यू यू ललित यांनी न्यायाधीश चंद्रचूड यांची उत्तराधिकारी म्हणून शिफारस केली होती. न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाळ १० नोव्हेंबर २०२४ पर्यत असेल.

न्यायमूर्तीचंद्रचूड यांचे वडील न्यायमूर्ती वायव्ही चंद्रचूड हे देखील २ फेब्रुवारी १९७८ ते ११ जुलै १९८५ या काळात भारताचे १६ वे सरन्यायाधीश होते. न्यायमूर्ती चंद्रचूड हे त्यांच्या उदारमतवादी आणि पुरोगामी निर्णयांसाठी ओळखले जातात, सर्वात अलीकडील निर्णय म्हणजे अविवाहित महिलांच्या २४ आठवड्यांपर्यंत गर्भपात करण्याच्या अधिकारांचे समर्थन करणारा निकाल.

ते याआधी देखील एका घटनापीठाचा भाग होते, ज्याने संमतीने समलैंगिकतेला गुन्हेगार श्रेणीतून बाद ठरवले आणि अनुच्छेद २१ अंतर्गत गोपनीयतेला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता दिली. सबरीमाला मंदिरात सर्व वयोगटातील महिलांच्या प्रवेशाच्या अधिकाराचे समर्थन करणाऱ्या निर्णयाचा देखील ते एक भाग होते. तसेच न्यायमूर्ती चंद्रचूड हे अयोध्या-बाबरी मशीद प्रकरणाचा निकाल देणाऱ्या ५ न्यायाधीशांच्या खंडपीठाचे सदस्य देखील होते.

# राज्यात कोरोनाच्या नव्या तीन विषाणूंचा शिरकाव

**मुंबई** :-राज्यात एकीकडे दिवाळीची धूम सुरु आहे तर दुसरीकडे थोडी चिंता वाढवणारी बातमी समोर येत आहे. राज्यात कोरोनाच्या तीन विषाणूची एन्ट्री झाल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्याची माहिती समोर येत आहे.तज्ज्ञांच्या माहितीनुसार, एक्सबीबी हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट राज्यात आढळून आला आहे.या नव्या व्हेरियंटमुळे रुग्णाची रोगप्रतिकारकशक्ती कमी होत असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच राज्यात बीए २.३.२० आणि बीक्यू.१ हे नवे व्हेरिएंट शिरकाव करत असल्याचे समोर आले आहे.तर राज्यातील कोव्हिड रुग्णसंख्या मागील आठवड्याच्या तुलनेत १७.७ टक्क्यांनी वाढली असून ठाणे, रायगड आणि मुंबई भागामध्ये ही वाढ अधिक ठळक प्रमाणात दिसत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर हिवाळ्यामध्ये हे प्रमाण वाढू शकते असा इशारा काही तज्ज्ञांनी दिला आहे.राज्यात बीए. २.७५ चे प्रमाण ९५ टक्के वरून ७६ % वर आले आहे. तर एक्सबीबी हा नवीन व्हेरिएंट राज्यात आढळला असून त्याचे प्रमाण वाढताना दिसतंय, हा व्हेरियंट बीए.२.७५ पेक्षा अधिक वेगाने पसरू शकतो असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# गोंदियात ४ ग्रापं.भाजपच्या तर १ काँग्रेसच्या ताब्यात

**गोंदिया** : जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतीकरिता रविवारी (ता. १६) मतदान प्रक्रिया पार पडली. सोमवारी (ता. १७) मतमोजणी झाली. या मतमोजणीत गोंदिया तालुक्यातील डोंगरगाव, गोरेगाव तालुक्यातील निंबा, देवरी तालुक्यातील सुकळी, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध या चार ग्रामपंचायतीवर भाजप समर्थित पॅनेलने, तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील भरनोली ग्रामपंचायतीवर काँग्रेस समर्थित पॅनेलने विजय मिळविला आहे.

मुदत संपलेल्या आणि विभाजन झालेल्या ग्राम पंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला होता. त्यानुसार, गोंदिया तालुक्यातील डोंगरगाव, गोरेगाव तालुक्यातील निंबा, देवरी तालुक्यातील सुकळी, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध व भरनोली या पाच ग्रामपंचायतींकरिता रविवारी (ता. १६) मतदान घेण्यात आले.

डोंगरगाव ग्रामपंचायतीकरिता ८६.७८ टक्के, निंबा ८४.६१ टक्के, सुकळी ७७.७७ टक्के, सिरेगावबांध व भरनोली ग्राम पंचायतीकरिता ७८.३५ टक्के इतके मतदान झाले. रविवारी मतदान यंत्रात बंद झालेल्या उमेदवारांचे भाग्य आज मतमोजणीच्या रुपाने बाहेर आले. या मतमोजणीत भाजप समर्थित पॅनेलने चार ग्रामपंचायतींवर दणदणीत विजय मिळविला. गोंदिया तालुक्यातील डोंगरगाव ग्रामपंचायतीत भाजप समर्थित कोमेश्वरी नरेंद्र टेंभरे सरपंच म्हणून निवडून आल्या.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील भरनोली ग्रामपंचायतीमध्ये काँग्रेस समर्थित गोंडवाना ग्रामविकास पॅनेलचे सरपंच व सदस्य निवडून आले. सरपंचपदी सुनीता धर्मराज कवडो विजयी झाल्या. प्रभाग क्रमांक-१ मधून मन्साराम ताराम, विनोद हलामी, लता देव्हारे, प्रभाग क्रमांक-२ मधून विश्वनाथ राऊत, पूर्णा शहारे, प्रभाग क्रमांक-३ मधून सुकलाल हलामी, सपना कोल्हे, निशा झाडे निवडून आले व कालिंदा होळी या बिनविरोध निवडून आल्या.

तसेच अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध ग्राम पंचायतीत सागरबाई चिमणकर या सरपंच म्हणून निवडून आल्या.

गोरेगाव तालुक्यातील निंबा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाजप समर्थित १ सरपंच, ६ सदस्य असे सात, तर काँग्रेस समर्थित ३ सदस्य निवडून आले.भारतीय जनता पक्ष समर्थित उमेदवार सरपंच म्हणून थेट मतदारातून वर्षा पटले या निवडून आल्या, तर सदस्य म्हणून संजय शहारे, संगिता कुंजाम, मालता भगत, नंदलाल उईके, पुरुषोत्तम कटरे, पुष्पा पटले निवडून आले.



देवरी तालुक्यातील सुकळी ग्रामपंचायतीत भाजप समर्थित कमलेश कल्लो सरपंच म्हणून निवडून आले.

# आमदार विनोद अग्रवाल यांची घरवापसी!



## भाजपात प्रवेश करण्याची शक्यता

**गोंदिया:** भाजपाला सोडचिठ्ठी देत स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आलेले गोंदियाचे अपक्ष आमदार विनोद अग्रवाल हे घरवापसी करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना उधाण आले आह.ते नगरपरिषद निवडणुकीच्या पुर्वी भारतीय जनता पक्षात पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या उपस्थितीत प्रवेश करणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तर यासंदर्भात त्यांची भाजपच्या वरिष्ठ नेतेमंडळींसोबत चर्चाही झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, वने, सांस्कृतीक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे देखील गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येऊन गेले,त्यावेळी त्यांच्यासोबत आमदार अग्रवाल यांची उपस्थिती हे प्राथमिक प्रवेशाची चिन्हे होती. दरम्यान, आमदार अग्रवाल यांच्याकडून अद्यापही अशी कुठलीही घोषणा करण्यात आलेली नाही.

उल्लेखनिय म्हणजे, आमदार विनोद अग्रवाल यांनी २०१४ या वर्षीची निवडणूक भाजपाच्या चिन्हावर लढवली होती. मात्र, या निवडणूकीत त्यांना अपयश आले होते. तर ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले होते. दरम्यान, त्यांनी सन २०१९ मध्ये झालेल्या निवडणूकीतही पक्षाच्या तिकीटावरून निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, भाजपाकडून ऐन वेळी काँग्रेसमधून भाजपात सामील झालेले माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांना उमेदवारी देण्यात आली होती. यावेळी विनोद अग्रवाल यांनी नाराजी व्यक्त करत स्वतंत्र निवडणूक लढवून भाजपाचे गोपालदास अग्रवाल यांचा पराभव केला होता. यानंतर त्यांनी चाबी संघटनेची स्थापना करुन भाजपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना चाबी संघटनेत समावून घेत भाजपाला धक्का दिला होता.

विशेष म्हणजे, मध्यंतरीच्या काळात सोशल मिडीयावर विनोद अग्रवाल व भाजपाच्या एका गुटात नेहमी असली-नकली वरुन रस्सीखेच पहावयास मिळत होती. त्यातच शिंदे-फडणवीस सरकारच्या स्थापनेच्या वेळी विनोद अग्रवाल यांनी आपला पाठींबा भाजपाला दिला. तेव्हापासून गोंदिया शहरासह जिल्ह्यात विनोद अग्रवाल हे भाजपामध्ये घरवापसी करणार अशा चर्चांना पेव फुटले होते. दरम्यान, या चर्चा आता सत्यात उतरण्याची चिन्हे आहे.

# गोंदिया जि.प.पं.स.सहकारी पतसंस्थेवर सहकार पॅनलची सत्ता



**गोंदियाः**- गोंदिया जिल्हा परिषद व पंचायत समिती कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. र.नं. १०२ निवडणुकीवर असलेली स्थगिती राज्य शासनाने उठविल्यानंतर अर्धवट राहिलेल्या गोंदिया जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणूकीकरीता १६ आँक्टोंबरला मतदान पार पडले.या निवडणुकीची मतमोजणी १७ आँक्टोंबरला जलाराम लॉन येथे पार पडली .२१ संचालकाकरीता झालेल्या निवडणुकीत एकता पँनलची सत्ता उलथवून सहकार पँनलने कब्जा केला.विशेष म्हणजे सचिव पदावर सहकार पॅनलचे कमलेश बिसेन विजयी झाले असून एकता पॅनलचे गुणवंत ठाकूर यांचा पराभव केला. तसेच संजय बनकर यांचा पराभव करीत सहकारचे सचिन कुथे विजयी झाले.संस्था स्थापनेपासून एकता पँनलच्या हातात असलेली सत्ता पहिल्यांदा हिसकावून घेण्यात सहकार पँनलला यश आले आहे. २१ पैकी १८ संचालक सहकार पँनलचे निवडून आले.

गोंदिया जिल्हा परिषद मुख्यालय गटातून एकता पॅनलचे चंदू धपाडे व सहकार पॅनलचे आनंद चर्जे विजयी झाले.तर तिरोडा पंचायत समितीमधून सहकार पॅनलने दोन्ही जागेवर विजय मिळविला.यामध्ये मनोज भुरे व दिलीप शेंडे यांचा समावेश आहे.

गोरेगाव पंचायत समिती गटातून एकता पॅनलचे शशीकांत बावनकर यांचा पराभव करीत सहकार पॅनलचे ग्रामसेवक ओ.जी.बिसेन विजयी झाले आहेत.तर गोंदिया पंचायत समिती गटातून सहकार पॅनलचे हंसराज गजभिये व एकता पॅनलचे रवी पटले विजयी झाले.

# पोलिस कर्मचाऱ्यांना मिळणार पूर्वीप्रमाणे दीडपट पगार

## आ.फुके यांच्या पत्राची उपमुख्यमंत्र्यांनी घेतली दखल



**गोंदिया:** नक्षलग्रस्त व संवेदनशील क्षेत्रात काम करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना दिला जाणारा दीडपट पगार व महागाई भत्ता महाविकास आघाडी सरकारच्या काळात एप्रिल २०२१ मध्ये बंद केला होता. यासंदर्भात आ. डॉ. परिणय फुके यांच्या पाठपुराव्यानंतर पोलिस कर्मचाऱ्यांना दीडपट पगार व महागाई भत्ता पूर्ववतव करण्यात आला आहे. तसे आदेश ३ ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आले आहे. नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यातील अतिसंवेदनशील भागात जीव धोक्यात घालणाऱ्या पोलिस विभागातील कर्तव्यदक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांना २०११ पासून नक्षलविरोधी अभियानासाठी दीडपट पगार व महागाई दिला जात होता. मात्र, महाविकास आघाडी सरकारने एप्रिल २०२१ पासून दीडपट पगार बंद करुन त्यांचे मनोधैर्य खचण्याचा प्रयत्न केला.

यासंदर्भात आ. डॉ. परिणय फुके यांनी २४ सप्टेंबर २०२२ रोजी नक्षलग्रस्त अशा संवेदनशील गोंदिया जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या या गंभीर प्रकरणाची दखल घेत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून गडचिरोली जिल्ह्याच्या धर्तीवर गोंदिया जिल्ह्यातील नक्षलविरोधी अभियानात सहभागी असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे दीडपट पगार व महागाई भत्ता देण्याची मागणी केली होती.

या पत्राची दखल घेत नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहानुभूती दाखवत पगारात दीड पटीने वाढ करून महागाई भत्ता देण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश प्राप्त होताच, गृह विभागाने तसा शासन निर्णय जारी केला. ज्यामध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्यात आली.पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार डॉ.परिणय फुके यांचे आभार व्यक्त करत पगार व महागाई भत्त्यात दीडपट वाढीचा आदेश मिळाल्याने आनंद व्यक्त केला.

## संपादकीय

# कुंडीमधल्या झाडांच्या मोठ्या मोठ्या सावल्या

देश धोक्यात आहे. लोकशाही धोक्यात आहे. प्रत्येक क्षेत्रात आग लागलेली आहे. लागलेली आग विझवण्यासाठी सारा देश प्रयत्न करतो आहे, ती गोष्ट तशी अत्यंत आनंददायी आहे. पण या धावपळीत दुसरे घोटाळे होऊ नयेत, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे!

जनता तर भाबडी आहेच, पण विचारवंत देखिल भाबडे आहेत, ही बाब चिंताजनक आहे. साहित्यिक, सांस्कृतिक चळवळी अत्यंत बाळबोध आहेत. अलीकडची साहित्य संमेलने म्हणजे अर्धवटांचे अभिमान सोहळे झालेले आहेत. अण्णा हजारे यांच्यासारखा सुमार आणि संभ्रमित माणूस डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या विचारवंतांचे आकलन कोणत्या दर्जाचे असेल, यावर चिंतन करायला हवे. एक 'लोकपाल' आला की देशातील सारा भ्रष्टाचार झटक्यात नाहीसा होईल, असल्या वेडपट कल्पना जर आमच्या देशात अथांग लोकप्रीय होत असतील, तर त्या देशाचे भवितव्य दुसरे काय असणार आहे? त्याच आंदोलनातून देशाला एक 'टोपी'बाज 'झंडू'बाम मिळाला. हा स्वतःला भगवान कृष्णाचा अवतार आणि बजरंगबलीचा दूत समजतो. विशेष म्हणजे, असले सोंगाडे आपल्या देशात भराभर लोकप्रीय होत असतात.

आपला देश मुळात भावनात्मक आहे. हळवा आहे. स्वतःच्या बुद्धीचा वापर करणे, आम्हाला आवडत नाही. एखाद्या अट्टल 'दारुड्या'ने केवळ आपल्या जातीच्या महापुरुषाचा फोटो भिंतीवर लावला, एवढ्या कारणासाठी उड्या मारणारे बुद्धिजीवी देखील कमी नाहीत.

एक काळ असा होता की शरद जोशी यांच्या मांडणीला लोक भुलले. शरद जोशी शेतकऱ्यांच्या समस्यांचे निदान फार प्रभावीपणे करायचे. पण बिमारीचे निदान वेगळे आणि त्यावर केलेले उपचार वेगळे. शरद जोशी रोगाचे निदान कुशलता पूर्वक करायचे, पण त्यावरील त्यांनी सांगितलेले उपाय मात्र अव्यवहार्य होते. वास्तवापासून दूर होते. तरीही त्या आंदोलनाला मातीचा स्पर्श होता, हे नाकारता येणार नाही. मात्र 'लोकपाल' आंदोलन हे जनतेसोबत निव्वळ चिटिंग होते. फुगा होते. त्यातूनच भुरट्या लोकांच्या हातात सत्ता जाण्याला मदत झाली. आज देशाला जी आग लागलेली आहे, त्याच्या मुळाशी हेच लोक आहेत. हेच आंदोलन आहे.

बुद्धाचा महान वारसा या देशाला लाभला आहे. गांधीसारखा प्रॅक्टिकल, दूरदर्शी आणि जमिनीवरचा महापुरुष या देशात पैदा झाला आहे. तरीही आम्ही पुन्हा पुन्हा का भरकटत जातो, हे अनाकलनीय आहे. तुकाराम, कबीर यांच्यासारख्या संतांचा मोठा वारसाही आपल्याकडे आहे. मानवी हक्काची ऐतिहासिक लढाई बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात यशस्वी झाली, हेही उदाहरण ताजे आहे. तरीही आम्ही पुन्हा पुन्हा फसव्या लढाईला का भुलत असतो? आमची समज एवढी बाळबोध कशी? आमच्या निष्ठा एवढ्या तकलादू कशा? अंधाभक्तांच्या टोळ्या तर नियमित तयार होतात, पण अनुयायांची नवी फसल का तयार होत नसावी?

'दक्षिणायन' नावाचं एक बुद्धिजीवी लोकांचं आंदोलन अलीकडे चर्चेत आहे. गणेश देवी यांचं नावही मोठं आहे. त्यांचा त्यांच्या क्षेत्रातील अधिकार मोठा असेलही, पण त्यांच्या सामाजिक धडपडीचा नेमका उद्देश काय, हे मला अजूनही समजलेलं नाही. मी स्वतः गोव्यातील त्यांच्या संमेलनात पूर्णवेळ सहभागी होतो. समजून घेण्याचा प्रयत्न केला. पण हाती काहीही लागलं नाही. (अर्थात माझी तेवढी बुद्धी नसावी) त्यांचं आयोजन मात्र नीटनेटकं आणि दखलपात्र असते, याचा उल्लेख केलाच पाहिजे.

परवा नागपुरात त्यांच्यातर्फे दोन की तीन (?) दिवसीय आयोजन करण्यात आलं होतं. राहूल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेला समर्थन गोळा करणे, धोक्यात असलेली लोकशाही वाचविणे.. वगैरे वगैरे उद्देश त्यामागे होते असे सांगितले जात होते. पण संबंधित विषयाबाबत आयोजनातील गांभीर्य मात्र चिंताजनक होते. प्रमुख वक्त्यांची मांडणी तेच ते दळण दळणारी होती. कसलेही नाविन्य त्यात नव्हते. त्यामुळे अनेक महत्वाचे लोक हॉलच्या बाहेरच फिरताना दिसत होते. एकंदरित हे आयोजन केवळ उपचाराचा भाग होता का?

विदर्भातील सामाजिक, साहित्यिक किंवा राजकीय क्षेत्रातील समविचारी लोकांचा ह्यात सहभाग दिसला नाही. नागपूर आणि विदर्भात मुस्लीम समाजाची मोठी संख्या आहे, त्यांना सोबत घ्यायला हवे होते, असा साधा विचारही आयोजकांच्या मनात का येऊ नये? आंबेडकरी चळवळ, विदर्भवादी चळवळ, काही शेतकरी नेते यांना विश्वासात घ्यायला काही हरकत होती का? विशिष्ट 'भजनी मंडळा'च्या बाहेरचे साहित्यिक, छोट्या मोठ्या राजकीय पक्षांचे नेते यांचे आयोजकांना वावडे होते का? त्यांच्याशी संपर्क साधला गेला होता का? साधला असेल तर ते लोक का आले नसावेत? (एखाद दुसरा अपवाद सोडला तर..) आणि जर नसेल साधला गेला, तर त्यामागे आयोजकांचा कोणता क्रांतिकारी विचार असावा?

बाहेरचेच वक्ते, बाहेरचेच सुत्रधार आणि विदर्भातील लोक रिकाम्या जागा भरायच्या कामाचे, असेच काहीसे नियोजन होते, अशी खदखद अनेकांनी बोलून दाखवली. काँग्रेसचे नेते येणार अशाही बातम्या होत्या. पण त्यांनी सामूहिक दांडी का मारली असावी? ते न आल्यामुळे एक अख्खे सत्र रद्द का करावे लागले? म्हणजे ही काँग्रेसी नेत्यांची उदासीन वृत्ती समजायची का? एखादी संघटना बिचारी तुमच्यासाठी जीव टाकते आणि तुम्ही चक्क तिच्याकडे पाठ फरवता, हा काय प्रकार आहे? की आयोजकच जबरदस्तीने काँग्रेसी नेत्यांच्या गळ्यात पडतात? किंवा त्यामागे काही वेगळे नियोजित धोरण/नियोजन वगैरे होते?

शेतकरी संघटना असो की लोकपाल असो, ही आंदोलनं जमिनीवरची होती. दक्षिणायनचा प्रयोग 'कुंडीतील झाडांचे मोठ्या पडद्यावरील प्रदर्शन' अशा स्वरुपाचा आहे. त्यामुळे काँग्रेसवाले त्याला फारसे गांभीर्याने घेत नाहीत, घेणारही नाहीत असे दिसते.

राजकारणी तसे चलाख असतात. बाहेरुन राहूल गांधींना प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे, त्यामुळे काँग्रेसी नक्कीच खुशीत असतिल. पण सावध देखिल झालेले आहेत. आजवर जे लोक काँग्रेसच्या विरोधात होते, तेच लोक आज काँग्रेसच्या वरातीत फुकटात नाचायला लागले, हे बघून आपल्यातली अनावश्यक गर्दी वाढता कामा नये, याचीही काळजी ते आपापल्या मतदार संघात घेत आहेत. कुणालाही फारसे लावून घेत नाही आहेत.

कारण त्यांना स्वतःचा मुलगा–सून, मुलगी – जावई यांच्या राजकीय हिस्स्यात कुणाचीही भागीदारी नको आहे. मात्र स्वतः पुढे येऊनही हे लोक काही करतानाही दिसत नाहीत. आधीच्या सत्तेत सहभागी किंवा लाभार्थी राहीलेले काँग्रेसी नेते भाजपला टरकून आहेत. अशावेळी राहूल गांधी आणि काँग्रेस यांच्यासमोर पदयात्रेनंतर खरे आव्हान उभे राहणार आहे. पुढील संघटनात्मक बांधणी कशी असेल, यावर पुढील लढाई आणि मिळणारे यश अवलंबून आहे.

वेळोवेळी आगी लागतच असतात. त्यासाठी घरातल्या महिलांनी नेहमीच सावध राहायचे असते. युवकांनी एकीकडे आग विझवायची असते, तर दुसरीकडे स्थानिक भुरट्यांना रोखण्यासाठी स्वतंत्र टीमही तयार ठेवायची असते. आपण जीवावर उदार होऊन आग विझवायची, हात पाय भाजून घ्यायचे आणि ज्यांच्या भ्रष्टाचारामुळे शॉर्ट सर्किट होऊन आग लागली, त्याच नेत्यांच्या पोरांना सरपंच म्हणून निवडून द्यायचे, असली घोडचूक पुन्हा पुन्हा होता कामा नये. आग विझवणारे जर आपण आहोत, तर गावचे सरपंचही आपल्या मधूनच कुणीतरी झाले पाहिजे. आपण म्हणू त्यातूनच निवडले गेले पाहिजे! पुढची सत्ता आगी लावणाराला किंवा त्याच्या पोराला देता कामा नये!

त्यासाठी आपली राजकीय, सामाजिक समज परिपक्व झाली पाहिजे. आपल्याला पडद्यामागच्या वास्तवाचा वेध घेता आला पाहिजे.

पण जर, कुंडीतल्या झाडांच्या सावल्याच आपल्याला आश्वासक वाटत असतिल, तर आपापले मेंदू तपासून घ्यावे लागतील.

कारण.. पुन्हा पुन्हा अशी गफलत आपल्याला, देशाला परवडणारी नाही!

**ज्ञानेश वाकुडकर**
**लोकजागर अभियान**
**९८२२२७८९८८**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# सावित्रीबाई फुले,गाडगेबाबा,सरस्वती आणि शाळाबंदी

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा पाया महात्मा जोतीराव फुले यांनी प्रत्यक्ष स्त्री–शुद्रांतिशुद्रांसाठी (ओबीसी, दलित, आदीवासी आणि सर्व स्त्रीया) शाळा सुरू करुन घातला. संत गाडगेबाबा यांची दशसुत्री सर्व मानवांच्या कल्यानासाठीची कृतिपत्रिका आहे. माता सावित्रीबाई फुले यांनी मुलींचे शिक्षण सुरू करून, स्त्री शूद्रातिशूद्र यांच्यावर शिक्षणबंदी लादणा?या मनुस्मृतीचा धिक्कार केला. शिक्षणाच्या अभावाने मनुष्याच्या अंगी पशुत्व येत असल्याने मनुस्मृतीची शिक्षणबंदी नाकारुन, स्त्री–शुद्रातिशुद्रांसाठी शाळा सुरू केल्या. शिक्षण , अर्थ व धार्मिक बंधनांमुळे मागास राहिलेल्या ओबीसी, दलित, आदिवासी इत्यादी समूहांच्या शिक्षणासाठी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्याच्या तिजोरीतील मोठी रक्कम खर्ची घातली. सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. शेतकरी कष्टकरी ओबीसी, दलित, आदीवासी इत्यादी बहुजन समाजाच्या विकासात अडथळे निर्माण करणारी धर्म बंधने झुगारली. समाजाला सुदृढ करुन समृद्धीच्या दिशेने झेपावण्यास बळ देणाऱ्या या प्रयत्नांना पुरोहितशाहीने खोडे घालण्याचा प्रयत्न वारंवार केला. १८४८ पूर्वीचे शिक्षण चांगले होते म्हणणारे, आता सरस्वतीला शिक्षणाचं प्रतिक म्हणू लागले. ज्या धर्म व्यवस्थेने कष्टकरी बहुजनांना शिक्षणवंचित केले, त्या व्यवस्थेला मजबूत करण्याचं काम सरस्वतीच्या प्रतिकातून केले जाते. सरस्वती ही कोणत्याही अंगाने शिक्षणाची देवी ठरु शकत नाही. आणि असलीच तर ती ३ टक्के लोकांना शिक्षण देणाऱ्या व्यवस्थेची देवी राहू शकते. ९० टक्के कष्टकरी जनतेला शिक्षण मिळण्यासाठी सरस्वतीचे किंवा तीला शिक्षणाची देवी म्हणून पुढे करणाऱ्या धर्मार्तंडांचे काहीही योगदान नाही. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात मोलाचे योगदान असलेल्या महापुरुषांच्या विषयीचे, त्यांना अभिवादन करणारे कार्यक्रम शाळा आणि कार्यालयांमध्ये झाले पाहिजे असा आग्रह मा. छगन भुजबळ करत असेल तर ते कष्टकरी ओबीसी दलित आदिवासी समाजाची बाजू घेणारे ,समतेची बाजू घेणारे, सत्याची बाजू घेणारे ठरतात. त्यांच्या विरोधात आगपाखड करणारे आजही आडवळणाने शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा विरोध करत आहेत. शिक्षणबंदीची पावले उचलताना दिसत आहे.

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाच्या बाजुचे सावित्रीबाई फुले यांना महत्वाचं स्थान देताना दिसतात तर बहुजनांच्या शिक्षणाला विरोध करणारे, १८४८ पूर्वीचे शिक्षण चांगले होते म्हणणारे सरस्वतीची ढाल करताना दिसत आहे. शाळाबंदीच्या निर्णयात देखील अशीच फाळणी स्पष्ट दिसून येते. आम्हाला फक्त शिकवू द्या या मोहिमेला साथ देणारे आणि विरोध करणारे अशी विभागणी केली तर हेच चित्र उभे राहते. ग्रामीण भागातील ओबीसी, दलित, आदिवासी तसेच सर्व स्त्रीया यांच्या शिक्षणाला विरोध करणारे सरस्वतीवादी, ग्रामीण भागातील शिक्षकांच्या बदनामीमध्ये सामील झालेले दिसतात या उलट सत्यशोधकी विचाराचे, शेतकरी, शेतमजूर चळवळीत काम करणारे, दलित, आदिवासी, ओबीसी आरक्षण चळवळीत, स्त्रीवादी चळवळीत काम करणारे ग्रामीण भागातील शिक्षकांना बदनाम करणाऱ्या मोहिमेच्या विरोधात, शिक्षकांच्या बाजूने उभे होताना दिसतात. याचा निट अन्वयार्थ समजून घ्यावा लागेल. ओबीसींच्या मनात घर करून असलेल्या धार्मिक भावनांचा फायदा घेत, कधी सरस्वती , कधी राम–कृष्ण, कधी हनुमान अशी प्रतिके वापरुन ओबीसींमध्ये फुट पाडण्याचे षडयंत्र रचले जातात आणि ओबीसींच्या अहिताचे निर्णय घेतले जातात. धार्मिक प्रतिमांच्या आधाराने भोळ्या ओबीसींना चिथावून, ओबीसींच्या न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या ओबीसी भावंडांना वेगळे पाडले जाते. अशी धार्मिक प्रतिके वापरले की ओबीसींच्या हिताचे कोणतेही काम न करता आपल्या कच्छपी लावता येते, हे सनातन्यांचे गणित असते. हिंदुत्वाच्या नावावर मुस्लिम द्वेष, दलित द्वेष पेरला की, ओबीसी स्वताच्या मुलांमध्ये वाढत चाललेली बेरोजगारी, शेतीच्या संबधित विवंचना तो विसरतो, याबाबतचे त्यांचे आराखडे आहेत. म्हणूनच जेव्हा जेव्हा ओबीसी हिताचे मुद्दे ऐरणीवर येतात, तेव्हा तेव्हा धार्मिक प्रतिके खुबीने वापरली जातात.ओबीसींची जातीनिहाय जनगणना झाली तर सर्वाधिक बेरोजगारीचे प्रमाण ओबीसींमध्ये असल्याचे स्पष्ट होईल. जातीव्यवस्था व धर्म व्यवस्थेने सर्वाधिक नुकसान ओबीसींचे केल्याचे स्पष्ट होईल. शाळाबंदीचे परीणाम देखील ओबीसी, दलित, आदीवासींवरच अधिक होणार आहे. धर्माची (हिंदुत्वाची) गुंगी चढवूनच शाळाबंदीची मोहीम फत्ते करण्याची चाल समजून घेता आली पाहिजे.




सत्यशोधक समाज शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरू होत असताना मा. छगन भुजबळ यांनी म.फुले समता परिषदेच्या वतीने, सत्यशोधक विचारांना जनमानसापर्यंत पोहचविण्यासाठी झिजणारे, धडपडणारे महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत डॉ. बाबा आढाव, डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. हरी नरके, डॉ. रावसाहेब ढवळे, डॉ. भारत पाटणकर, पत्रकार उत्तम कांबळे व इतर मान्यवरांचा सत्कार जानता राजा मा. शरदचंद्र पवार यांचे हस्ते घडवून आणला. याप्रसंगी सत्यशोधक विचार आणि शिक्षण क्षेत्र धर्मनिरपेक्ष असले पाहिजे. सरस्वती सहीत कोणत्याही धार्मिक प्रतिमांना स्थान असू नये, अशी चर्चा होणे स्वाभाविक आहे. सत्यशोधक समाजाचा तो मुलभूत विचार आहे. शिक्षणाच्या गाभाभूत घटकांमध्ये त्याचा समावेश केलेला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मातितता (धर्मनिरपेक्षता) , स्त्री–पुरुष समानता, बंधूंभाव, अंधश्रद्धा निर्मूलन, श्रमप्रतिष्ठा, स्वातंत्र्याचा इतिहास, लोकशाही, मनुष्यबळाचा विकास, सर्वांना समान संधी इत्यादी शिक्षणाचे गाभाभूत घटक आहेत. स्वातंत्र्योत्तर जवळपास सर्वच शिक्षण आयोगांनी या गाभाभूत घटकांचा उल्लेख करुन स्विकार केलेला आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला गती देण्यासाठी खडू फळा योजने अंतर्गत गाव तेथे शाळा आणि प्रत्येक गावात चांगले शिक्षण मिळावे म्हणून एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळांमध्ये रुपांतर करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली. १९९० –९२ च्या दरम्यान पट कितीही असला तरी किमान दोन तरी शिक्षक प्रत्येक शाळेत राहिल, याची काळजी घेतली गेली. सर्व सुविधा आल्या नसल्या तरी खेड्यापाड्यात खऱ्या अर्थाने शिक्षण पोहचवण्याचं महत्वपूर्ण कार्य १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने केले. १९९५ पर्यंत सर्व एकशिक्षकी शाळा दोन शिक्षकी करण्यात आल्या. काही अपवाद वगळता देशाच्या खेड्यापाड्यात शिक्षण १९९५ ला पोहचले असे आपल्याला म्हणता येईल. मुलांची पायपीट आणि गळती थांबवण्यात मागील दहा पंधरा वर्षात बऱ्यापैकी यशही आले. परंतु ग्रामीण भागातील कष्टकरी बहुजन समाजातील मुले जशी स्पर्धेत येऊ लागली तशी जात वर्चस्ववादी मंडळी कासावीस होऊ लागली. कोणतीही कारणे शोधत ग्रामीण भागातील शिक्षणाला, शाळांना, शिक्षकांना बदनाम करण्याची कारस्थाने करायला लागली. आतापर्यंत ग्रामीण शेतकऱ्यांच्या भरोष्यावर अर्थव्यवस्था मजबूत करणारे त्यांच्या पोरांचे शिक्षणाचा खर्च परवडत नाही म्हणू लागली. हजारो वर्षे वंचित राहिलेल्या बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचायला केवळ २०–२५ वर्षेच झालेली असताना, ते परवडत नाही म्हणून बंद करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. शासनाकडे जमा कर सर्वसामान्यांच्या खिशातून गोळा होते. त्यांचेच पैसे त्यांच्यासाठी खर्च करताना परवडत नाही म्हणणे कितपत संयुक्तिक आहे. लोकशाहीत सर्वसामान्य जनता हीच खरी मालक असते, याची जाण असली पाहिजे.

शिक्षणाच्या गाभाभूत घटकांना छेद देणारी धार्मिक प्रतिके शाळांमध्ये घुसडण्यात आली. धार्मिक भावनांच्या प्रभावात लोकांना आणून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला सुरुंग लावण्याचे प्रयत्न जोरात सुरू झालेले आहे. मा. भुजबळांच्या भूमिकेला विरोध करणारे, सरस्वतीच्या माध्यमातून शिक्षणाच्या मूलभूत तत्वांना छेद देत आहे. म्हणूनच सत्यशोधक समाज सुवर्ण महोत्सवी वर्षात ओबीसी दलित, आदिवासी आणि समस्त स्त्रीयांनी सत्यशोधक चळवळीचा विचार, समतेचा विचार, बंधुत्वाचा विचार, न्यायाचा विचार समजून घेण्याची गरज आहे. संत गाडगेबाबां यांची लोककल्याणकारी दशसुत्री बाजुला करणारांची मानसिकता, सरस्वतीचा कंठशोष करणारांची आंतरिक भूमिका बळीराजाचा विरोधात आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे.

निकोप मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी, शिक्षणाच्या गाभा घटकांना बांधील राहणे आवश्यक आहे. मानवी कल्याणाचे बीजारोपण त्यातून होणार आहे. करांच्या माध्यमातून गरीबातल्या गरीब कुटुंबाकडून किमान १५–२० हजार रुपये कर गोळा करणारे १३० रुपये दिवाळी भेट देत असेल, तर असल्या लोकांची बंडलबाजी समजली पाहिजे. म्हणूनच महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीतील कृष्णराव भालेकर, भास्करराव जाधव, जेथे जवळकर, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख , संत गाडगेबाबा इत्यादी सत्यशोधक पुढारी बंडलबाज थापाड्यांवर तुटून पडतात. त्यांच्या अस्सल समाजहिताच्या भावना आपल्या उराशी बाळगणे आवश्यक आहे. समाजहिताचे वाटोळे करणाऱ्या बंडलबाज धर्म भावनांचे मार्केटिंग करणाऱ्या दुष्टांचे मनसुबे उधळून लावले पाहिजे. हिंदुत्वाचे सोंग करणारे पुरोहितशाहीला बळकट करुन शेतकरी कष्टकरी ओबीसी, दलित, आदिवासींच्या हिताला बाधा पोचवताना दिसत आहे. ओबीसींच्या ५२ टक्के प्रतिनिधित्वाची बात करत नाही, जातिनिहाय जनगणनेचं नाव काढत नाही. या विषयावर सरळ बोलण्याचे धैर्य ज्यांच्याकडे नाही, महान फुले दांपत्यांचे महान शैक्षणिक कार्य समजून घेणे, संत गाडगेबाबा यांचे लोककल्याणकारी विचार समजून घेण्याची प्रज्ञा ज्यांच्याकडे नाही ते विषमतेचे पाईक आहेत. कपटी वामण, कृर परशुराम, स्त्रीयांचा अपमान करणारी मनुस्मृती हे ज्यांचे आदर्श आहेत, ते बळीराजाचे समतावादी न्यायवादी विचाराचे पाईक होऊ शकत नाहीत. ओबीसींच्या भाबडेपणाचा फायदा उपटण्यासाठी सरस्वतीच्या माध्यमातून, धर्म भावनेच्या माध्यमातून भोळ्या लोकांना फसवण्याचा धंदा करतात. म्हणून आपली विद्येची प्रेरणास्थाने महात्मा जोतीराव, सावित्रीमाई, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा हेच आहेत.

**जय सत्यशोधक**
**बाबा बीडकर**

# बेसुमार बिलमुक्तीचा सौरटॉफ

**गोंदिया:** महावितरणच्या घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना घरावर सौरउर्जा निर्मितीची यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाच्या सौरटॉफ योजनेंतर्गत ४० टक्क्यापर्यंत अनुदान मिळणार आहे. या योजनेंतर्गत गृहनिर्माण संस्थांनाही २० टक्के अनुदान मिळणार आहे. या सौरउर्जेमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वीज बिलांची बचत होणार आहे.




केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या सौरटॉफ योजनेनुसार, घरगुती वर्गवारीतील ग्राहकांना किमान एक किलोवॅट क्षमतेची छतावरील सौरउर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून वित्त सहाय्य देण्यात येणार आहे. यामध्ये १ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान मिळणार आहे. तसेच गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटनांना २० टक्के अनुदान मिळणार आहे. या योजनेची प्रक्रिया राबविण्यासाठी महावितरणच्या गोंदिया परिमंडळात एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**रूफटॉप योजनेंतर्गत जाहीर किंमत**

केंद्र शासनाच्या नवीव व नवीकरणीय उर्जा मंत्रालयातर्फे सौरऊर्जा यंत्रणेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना पाच वर्षाच्या देखभाल खर्चासह १ किलोवॅटच्या ऊर्जा निर्मितीसाठी ४६ हजार ८२० रुपये खर्च येणार आहे. या खर्चामध्ये ग्राहकांना ऊर्जा मंत्रालयाकडून ४० टक्के अनुदान मिळणार असल्यामुळे हा खर्च पुन्हा कमी होणार आहे.

**वीज बिलाचे मिटणार टेंशन**

दरमहा १०० युनिटपर्यंत वापर असलेल्या घरगुती ग्राहकांकडील एक किलोवॅट क्षमतेच्या सौर यंत्रणेमधून वीज बिलामध्ये सध्याच्या वीजदरानुसार दरमहा सुमारे ५५० रुपयांचा बचत होणार आहे. तसेच या यंत्रणेला लावण्यात आलेल्या नेटमीटरिंगनुसार वर्षअखेर शिल्लक वीज प्रति युनिटप्रमाणे महावितरण विकत घेणार आहे. त्यामुळे ग्राहकांना याचाही आर्थिक फायदा होणार आहे.

# सन २०१४ मध्ये काँग्रेस संपणार,घडी बंद होणार

**गोंदिया:** भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विजयाचा संकल्प घेऊन काम केल्यास काँग्रेस पक्ष सन २०१४ च्या निवडणुकीत संपेल तर राष्ट्रवादीची घडी बारामतीतूनच बंद करु असा विश्वास प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

येथील जलाराम लॉनमध्ये आयोजित भाजप कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी विदर्भ संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, खासदार सुनील मेंढे, खासदार अशोक नेते, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार विजय रहांगडाले, भाजप जिल्हाध्यक्ष केशव मानकर, माजी मंत्री राजकुमार बडोले, जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी आमदार हेमंत पटले, संजय पुराम, गोपालदास अग्रवाल, रमेश कुथे, भेरसिंह नागपुरे, खोमेश रहांगडाले, माजी जि.प. अध्यक्ष नेतराम कटरे, विजय शिवणकर,माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, रचना गहाणे, भंडारा–गोंदिया जिल्हा संपर्कप्रमुख वीरेंद्र अंजनकर, लायकराम भेंडारकर, मदन पटले, सुभाष आकरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना बावनकुळे यांनी भाजपा कार्यकर्त्यांनी हार्ट टू हार्ट व मॅन टू मॅन काम करावे असा सल्ला देत ज्या पक्षासाठी आपण काम करीत आहोत. ते १८ कोटी सदस्य असलेला जगातला सर्वात मोठा पक्ष आहे. पक्षाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील १५० हून अधिक देशांनी त्यांचा नेता म्हणून मान्यता दिली आहे. केंद्र व राज्यात सत्ता असणारे हे जुळे सरकार आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांनी चिंता करण्याची गरज नाही. जनहिताची कामे होणारच यात कोणतीही शंका नसल्याचे सांगितले.

तसेच मतदारांच्या कमळाचे बटन दाबल्यानेच काश्मिरमधून ३७० कलम हटले, अयोध्येत श्री राम मंदिराचा निर्माण होत आहे.

जगात पसरलेल्या कोरोना महामारीवर भारताला विजय मिळविता आला आहे. ही कामे अशीक सुरु राहावी यासाठी पक्षासाठी केवळ दोन तास मेहनत करुन १०० कार्यकर्ते जोडले पाहिजे. पंतप्रधान मोदींच्या योजनांचा लाभ घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी २० घरांचे पालकत्व घ्यावे असे आवाहन त्यांनी केले.



**नेत्यांनी मोटारसायवरुन फिरावे**

भाजपचे नेते व कार्यकर्त्यांनी लोकापर्यंत पोहोचण्यासाठी मोटारसायकलवरुन फिरून पोहचले पाहिजे. असे आवाहन करीत सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मंडळाच्या बैठकी तत्काळ घ्याव्या असे सांगितले. धन्यवाद मोदीजी या उपक्रमात जिल्ह्यातून एक लाख पत्रे पाठविण्याचे आवाहन करीत हा संकल्प पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले.

# नेत्रदानाचा संकल्प करुया; अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश आणूया

"हिरवे हिरवे गार गालिचे, हरीततृणांच्या मखमलाची, त्या सुंदर मखमालीवरती फुलराणी ही खेळत होती' बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांची ही कविता लहानपणी आपण वाचली अथवा ऐकली असेलच. पावसाने न्हावून निघालेली हिरवीगार सृष्टी तुम्ही पाहिली असेल. तुफान पाऊस अंगावर खेळवत गावामध्ये, रानावनात खेळत, सप्तरंगी इंद्रधनुष्यही पाहिले असालच. हे सर्व आपण बघू शकतो कारण आपल्याकडे दृष्टी आहे. परंतु जरा विचार करा ज्यांच्याकडे ही पाहण्याची दृष्टीच नाही त्यांचे काय?... आपण मरणोत्तर नेत्रदानाने नवी दृष्टी देऊन त्यांच्या जीवनात प्रकाश आणू शकतो !

डोळ्यांच्या अनुवंशिक आजारांमुळे, जंतुसंसर्गामुळे, अपघातामुळे व डोळ्यांची योग्य निगा न राखल्यामुळे अकाली अंधत्व येऊ शकते. यापैकी जवळपास ८० टक्के अंधत्व टाळता येऊ शकते अथवा उपचाराने बरे होण्यासारखे असते. आपल्या देशातील अंध ५ व्यक्तींपैकी १ म्हणजे साधारणत: ३ लाख लोक हे बुबुळाच्या आजाराने ग्रस्त आहेत. दरवर्षी त्यामध्ये नव्याने ४० हजार ते ५० हजार रुग्णांची भर पडत असते. यापैकी बहुसंख्य रुग्णांना बुबुळरोपण (नेत्ररोपण) शस्त्रक्रियेने दृष्टी प्राप्त होऊ शकते. दरवषी १ लाख नेत्राची आवश्यकता आहे. परंतु जवळपास २६ हजार बुबुळांचे नेत्रदान होते. अंध बांधवासाठी लागणारे नेत्र व नेत्रदातांकडून गोळा होणारे नेत्र यांची तफावत भरून काढण्यासाठी जवळपास ७४ ते ७५ हजार बुबुळांची आवश्यकता आहे.

त्यामुळे नेत्रदानाचे महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे. मरणोत्तर नेत्रदान आपल्या परिवाराची परंपरा बनवूया व आपल्या नातेवाईकांना देखील आपल्या संकल्पात सहभागी करूया.

**अंधत्व येण्याची कारणे**

अंधत्व वेगवेगळ्या प्रकारचे असते. दृष्टीदोष काचबिंदू, बुबुळांचे आजार, मोतिबिंदू, मागील पडद्याचे आजार असतात. त्यामध्ये बुबुळाच्या आजारामुळे भारतात २ लाखांवर अंध आहेत. बुबुळाच्या आजारामुळे येणारे अंधत्व मुख्यतः कॉर्निअल अल्सर, डोळ्याला होणाऱ्या इजा, 'अ' जीवनसत्वाचा अभाव, केमिकल बर्न्स, अनुवंशिकतेमुळे होणारे बुबुळाचे आजार, शस्त्रक्रियेनंतर बुबुळाला येणारी सूज आदी कारणामुळे होते. या सर्व कारणामुळे येणाऱ्या अंधत्वावर बुबुळरोपण शस्त्रक्रिया हा एक आशेचा किरण आहे.

**नेत्रदान कोणी करावे?**

मरणोत्तर नेत्रदानास वयाची अट नाही. नेत्रदान कोणत्याही जातीच्या, धर्माच्या, वंशाच्या, पंथाच्या व्यक्तीला करता येते. कोणताही रक्तगट असलेल्या व्यक्ती नेत्रदान करु शकतात. मोतीबिंदू, काचबिंदुच्या शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांनाही नेत्रदान करता येते. नेत्रदानाची शस्त्रक्रिया केलेले रुग्णही मरणोत्तर नेत्रदान करु शकतात.

**नेत्रदान करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी**

मरणोत्तर नेत्रदान सहा तासांच्या आत करावयास हवे, त्याकरीता त्वरीत नेत्रपेढीशी संपर्क साधावा. नेत्रदात्याच्या खोलीतील पंखे बंद करावेत. डोळ्यामध्ये (अँटिबायोटिक्स) औषध घालावे. अथवा पाण्याची पट्टी ठेवावी. जवळच्या नेत्रपेढीशी संपर्क साधावा. पुणे शहरात ससून सर्वोपचार रुग्णालयाबरोबरच अन्य नेत्रपेढ्या आहेत. नेत्ररोपण शस्त्रक्रिया (किरॅटोप्लास्टी) ससून रुग्णालयाच्या नेत्र विभागात मोफत केली जाते.




**नेत्रदानाविषयी वस्तुनिष्ठता**

नेत्रदान केल्यानंतर चेहऱ्यास विद्रुपता येते असा गैरसमज आहे. डोळ्याच्या खोबणीत मऊ कापूस किंवा प्लास्टिकचा डोळा ठेऊन पापण्या व्यवस्थित बंद करता येतात. शरिरातील एखादा अवयव काढल्याने पाप लागते हा गैरसमज असून उलट नेत्रदानाद्वारे दोन व्यक्तीचे संपूर्ण जीवन उभे करण्याचे किती तरी मोठे पुंण्याचे काम होते. म्हणूनच म्हणतात "मरावे परि नेत्ररुपी उरावे'.

नेत्रशस्त्रक्रियेत बकरीचा डोळा बसवता येतो हा गैरसमज आहे. बकरीच्या डोळ्याची रचना व मानवाच्या डोळ्याच्या रचनेत मुलभूत फरक असतो. शस्त्रक्रियेदरम्यान कॉर्निया फक्त बदलला जातो. तेव्हा तो डोळा बसवला जात नाही. नेत्रदानाकरीता भरावयाचे नेत्रदान संकल्प पत्र नेत्र विभागात विनामूल्य उपलब्ध आहेत. आधिक माहितीसाठी नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र विभागाशी संपर्क साधावा.

शरीरकी अंधता नही मनकी अंधता बडा मर्ज है..

उजाला लाने के लिए नेत्रदान हम सब का फर्ज है..

चिता में जायेगी राख बन जायेगी.. कब्र में जायेगी मिट्टी बन जायेगी..

नेत्रोंका कर दो दान.. किसी की जिंदगी गुलजार बन जायेगी..

डॉ. सतीश शितोळे, नेत्रतज्ज्ञ, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे: लोकशिक्षणाद्वारे लोकांना बुबुळाच्या आजाराची माहिती देऊन बुबुळाचे आजार अथवा त्यामुळे येणारे अंधत्व नेत्ररोपणाने बरे करता येते हे नागरिकांना पटवून देण्याचा प्रयत्न करत आहोत. यासाठी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग घेत आहोत. अंधजनांना दृष्टीच्या माध्यमातून प्रकाशमय जीवन प्राप्त करून देण्यासाठी फक्त नेत्रदानाची प्रतिज्ञा न करता मृत्यूपश्चात नेत्रदान करणे आवश्यक आहे व नातेवाईकांनीही ते कृतीत आणणे आवश्यक आहे.

**संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# गोऱ्हे संस्थेतही पावणेदोन कोटींचा अपहार

## आदिवासी महामंडळाची कारवाई : संचालक मंडळासह अधिकारी,कर्मचाऱ्यांवर गुन्हे

**सालेकसा:** सालेकसा येथील सेवा सहकारी संस्थेत खरीप आणि रबी हंगामात दीड कोटी रुपयांच्या धानाची अफरातफर केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. त्या संस्थेचे संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली होती. शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी सालेकसा तालुक्यातीलच गोऱ्हे येथील आदिवासी सेवा सहकारी संस्थेत खरीप आणि रबी हंगामात १ कोटी ७७ लाख ३७ हजार ९३ रुपयांचा अपहार झाल्याचे उघड झाले आहे. त्या संस्थेचे संचालक मंडळ, आदिवासी विकास मंडळाचे व्यवस्थापक, ग्रेडर, सचिव यांच्याविरोधात सालेकसा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्ह्यात खरीप आणि रबी हंगामात शेतकऱ्यांनी पिकविलेल्या धानाला चांगले दर मिळावे, याकरिता हमी भाव दराने धान खरेदी करण्यात येते. त्याकरिता पणन महासंघ आणि आदिवासी विकास महामंडळ या संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. या संस्था सब एजंट म्हणून सेवा सहकारी संस्थांची निवड करतात. तीन महिन्यांपूर्वी जिल्ह्यात रबी हंगामातील धान खरेदीत मोठ्या प्रमाणात घोळ झाला होता. त्याची चौकशी करण्यात आली. चौकशीत मोठे घबाड समोर आले होते. त्या संस्थांवर कारवाई देखील झाली होती. आता पुन्हा काही संस्था रडारवर आल्या असून त्यांची चौकशी करुन कारवाईचा सपाटा सुरू करण्यात आला आहे. शुक्रवारी सालेकसा येथील समृद्ध किसान सहकारी संस्थेत दीड कोटी रुपयांच्या धानाचा अपहार झाल्यामुळे संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली होती. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था गोऱ्हे या संस्थेला खरीप आणि रबी हंगाम २०२१-२२ मध्ये धान खरेदीचे अधिकार देण्यात आले होते. संस्थेने खरीप हंगामात १४५८०.४० क्विंटल आणि रबी हंगामात ३१०१५.४० क्विंटल अशा एकूण ४५५९५.८० क्विंटल धानाची खरेदी केली होती. खरेदी केलेले धान मिलिंगकरिता निवड झालेल्या राईस मिलर्सला द्यायचे होते. त्याकरिता राईस मिलर्सला डिओ देण्यात आले होते. संस्थेने खरेदी केलेल्या धानापैकी ३६८३२.३३ क्विंटल धानाचा पुरवठा केला. ८७६३.४७ क्विंटल धान पुन्हा देणे गरेजेचे होते. मात्र ते धान मिलिंगकरिता देण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाचे लेखा व्यवस्थापक सुरेशराव भागवत, प्रतवारीकार पंकज तुकाराम सावळे, कनिष्ठ सहाय्यक भूषण भांडारकर, कुलदीप कुलसुंगे यांनी १ ऑक्टोबर रोजी संस्थेतील गोदामाची चौकशी केली. गोदामात फक्त १५० क्विंटल धान शिल्लक असल्याचे आढळून आले. उर्वरित धानासंदर्भात संयुक्तिक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे १ कोटी ६७ लाख १० हजार १३१ रुपये किमतीच्या ८६१३.४७ क्विंटल धानाचा अपहार केल्याप्रकरणी सालेकसा पोलिसांत संस्थेचे संतोष मडावी, शिवाजी कोसमे, अरुणा फुंडे, जयलाल पटले, हिरामण जिंदाफोर, जाडू गावड, खोदुलाल टेकाम, रामजी सिरसाम, पूर्णा पंधरे, अनिल फुंडे, आदिवासी विकास महामंडळाच्या प्रतवारीकार मुन्जा एम. इंगळे, आदिवासी विकास महामंडळाचे प्रतवारीकार चेतन जुगनाके, रोजंदारी प्रतवारीकार गजानन मरस्कोल्हे, आदिवासी विकास महामंडळाचे उपप्रादेशिक व्यवस्थापक आशिष मुळेवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### बारदान्याचाही अपहार

**गोऱ्हे येथील आदिवासी सेवा सेवा सहकारी संस्थेच्या गोदामात १ कोटी ६७ लाख रुपये किमतीचे खरेदी केलेले धान नसल्याची बाब उघडकीस आली. त्याचबरोबर चौकशी समितीने केलेल्या चौकशीत १० लाख २७ हजार ८०७ रुपये किमतीचा २५६३४ किलो बारदाना देखील नसल्याचे उघड झाले.**

### अनेक संस्थांत गैरव्यवहार

**सध्या सालेकसा तालुक्यातील दोन संस्थांची चौकशी झाली असून त्यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला. खरीप आणि रबी हंगामात दरवर्षी खरेदी करणाऱ्या संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात येतो. शेतकऱ्यांचे धान खरेदी न करता व्यापाऱ्यांचे धान खरेदी करण्यात येते. अनेक संस्था केवळ कागदावर खरेदी दाखवून शासनाकडून पैसे लाटतात. जिल्ह्यातील सर्वच संस्थांची चौकशी झाल्यास अब्जो रुपयांचा घोळ समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

# रस्त्याच्या दुरुस्तीसाठी युवा बहुजन मंचच्यावतीने मुंडण आंदोलन



**गोंदिया:** शहरातील शास्त्री वार्ड परिसरातील रस्ते व नाल्यांची दुरावस्था झाली आहे. परिणामी तिथे राहणाऱ्या नागरिकांना आवागमन करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांची व नाल्यांची दुरुस्ती करण्यात यावी, या मागणीला घेवून युवा बहुजन मंचच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात होते. त्या निवेदनाची दखल न घेतल्यास मुंडण आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. नगरपरिषदेने याकडे दुर्लक्ष केल्याने १६ ऑक्टोबर रोजी मुंडण आंदोलन करण्यात आले.

यावेळी बहुजन युवा मंचचे सुनिल भोंगाडे, रवी भांडारकर, संजु यादव, संजु भांडारकर, प्रकाश, जलील, कालु यादव, सोनु गजभीये, राजु नेवारे आदींनी मुंडण होत नगरपरिषद प्रशासनाचा निषेध नोंदवला. आंदोलनात प्रेम जायस्वाल, जी.आय.उरकुडे, डॉ.रुपसेन बघेले, राध्येश्याम कुरंजेकर, अशोक चुटे, केशरीचंद बिसेन, वर्षा राठोड, कमलाबाई कुरंजेकर, प्रेमलाल साठवणे, कैलाश भेलावे, सोनु पारधी, राम कृष्णा गौतम, मुकेश खोबरागडे, इकबाल खान, अनिल लोणारे, पप्पू मुनेश्वर, संजय जायस्वाल आदी परिसरातील नागरिक आंदोलनात सहभागी झाले होते.

शहरातील शास्त्री वॉर्डातील केएमजे हॉस्पिटल व यूनाईटेड हॉस्पिटल समोरील व सभोवतालच्या सांडपाणी वाहत असलेल्या नाल्या पूर्णत: केरकचरा व मलब्याने भरलेल्या आहेत. यामुळे दूषित पाणी व पावसाचे पाणी नेहमिच रस्त्यावर वाहत असते व ते साचुन घाण चिखल झालेला आहे. या साचलेल्या घाणीमुळे येण्याजाण्याला त्रास तर आहेच. पण, त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती आहे व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे.

योग्य नियोजन न केल्यामुळे केएमजे हॉस्पिटल, यूनाइटेड हॉस्पिटल व परिसरातील अन्य रिहायशी इमारतीमुळे परिसर केरकचरा व मलब्याने भरलेला राहतो आणि सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्या अरुंद्ध होतात. शास्त्री वॉर्ड परिसरातील रस्ते व नाल्यांची येत्या दहा दिवसात दखल न घेतल्यास न झाल्यास युवा बहूजन मंच व वॉर्ड परिसरातील नागरिक हे खासदार-आमदार, माजी नगरसेवक, नगर परिषद शासन प्रशासनाच्या नावाने मुंडन कार्यक्रम घेण्यास बाध्य राहतील, असा इशारा दिला होता. त्या अनुषगाने १६ ऑक्टोबर रोजी मुंडण आंदोलन करण्यात आले.

# पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना ओबीसी वसतीगृहासबंधी निवेदन सादर

## वसतीगृह इमारत बांधकाम पुर्ण होईपर्यंत भाड्याच्या इमारतीत वसतीगृह सुरूकरण्याचे आश्वासन



**गोंदिया:-** ओबीसी एसबीसी व्हीजेएनटी समन्वय समिती विदर्भ, ओबीसी अधिकार मंच, ओबीसी संघर्ष कृती समितीसह इतर सघंटनाच्यातीने १० ऑक्टोंबर रोजी ओबीसींच्या विविध मागण्यासंदर्भात गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार व विधानपरिषद सदस्य डॉ.परिणय फुके यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात राज्यात ३६ जिल्ह्यात ओबीसी मागासवर्गीय मुलामुलीसांठी ७२ वसतीगृह मंजुर करण्यात आले असून त्याकरीता सुमारे ७२ कोटी रुपयाच्या निधीला व वसतीगृहासाठी लागणार कर्मचारी वर्गाला पदमान्यता देण्यात आली आहे. वसतीगृहाच्या इमारती पुर्ण होईपर्यंत चालू शैक्षणिक सत्रापासून भाड्याच्या इमारतीत वसतीगृह सुरू करावेत. अनुसूचित जाती व जमाती विद्यार्थ्यांकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू करण्यात आली आहे, त्यानुसार ही योजना ओबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांना लागु करण्यात यावी. इतर मागास वर्ग आर्थिक विकास महामंडळास लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वळता करावे आदी मागण्याचे निवेदन देण्यात आले.

यावेळी ओबीसी अधिकार मंच व समन्वय समितीचे खेमेंद्र कटरे, ओबीसी संघर्ष कृती समितीचे कैलास भेलावे, अशोक लंजे, माजी नगरसेवक बंटी पंचबुध्दे, जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती सोनू कुथे, दिनेश कुर्वे, गौरव बिसेन आदी ओबीसी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री मुनगंटीवार व आमदार फुके यांनी गोंदियाच्या वसतीगृहाचा प्रश्न लवकरच निघाली काढण्याचे आश्वासन देत यावर्षापासूनच मुलांना लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न असल्याची ग्वाही दिली.यासोबतच निवेदनात ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना केंद्रात १९९८ व राज्यात सन २००२-०३ पासुन १००: शिष्यवृत्ती लागु करण्यात आली होती. षासन निर्णय क्र.इ.मा.व. २००२/प्र. क्र. ४१४ धमावक -३ दिनांक २९ मे २००३ च्या परिपत्रकानुसार अनुसुचित जाती जमातीच्या धरतीवर राज्य शासनाने शालांत परिक्षेत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केली होती.

सन २००२-०३, २००३-०४, २००४-०५, २००५-०६ या वर्षात १००: शिष्यवृत्ती देण्यात आली. नंतर राज्य शासनाने ज्यांचे उत्पन्न १,००,०००/- च्या खाली आहे त्यांना निर्वाह भत्ता १००: व प्रशिक्षण शुल्क/परिक्षा शुल्क ५०: देण्यात येत आहे. तरी शासन परिपत्रकानुसार ओबीसी विद्यार्थ्यांना १००: शिष्यवृत्ती देण्यात यावी. व्यावसायीक कोर्स मधील एम.बी.ए., एम.सी.ए., एम. टेक, बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस. व नर्सिग या कोर्सेसना भारत सरकार शिष्यवृत्ती देण्यात येत नाही तरी १००: शिष्यवृत्ती सुरू करण्यात यावी. व मागील चार वर्षापासुन थकीत असलेली शिष्यवृत्ती लवकरात लवकर विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी करण्यात आली.

# प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीत तलाठ्याने केला घोळ

## सेजगाव ग्राम पंचायतीतील प्रकार, सरपंचासह गावकऱ्यांचा विरोध

**गोंदिया :** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्या १३ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली. मात्र तिरोडा तालुक्यातील सेजगाव येथील तलाठ्याने चक्क प्रारुप मतदार यादीमध्येच घोळ केल्याचे समोर आले आहे. परिणामी यावर आक्षेप घेण्यात येणार आहे, अशी माहिती सरपंच कंठीलाल पारधी यांनी दिली असून गैरप्रकार करणाऱ्या तलाठ्यावर प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या ग्राम पंचायतीच्या प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द झाल्या असून त्यावर १८ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहे.

विधानसभा मतदारसंघाच्या ३१ मे २०२२ रोजी अस्तित्वात आलेल्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्या प्रभागनिहाय विभाजित केल्यानंतर १३ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रारुपाच्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यावर १८ ऑक्टोबर २०२२ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येणार आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या २१ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरुस्ती करणे इत्यादी स्वरुपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. कारण विधानसभेच्या संबंधित तारखेला अस्तित्वात असलेल्या याद्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आहे तशा वापरल्या जातात. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागनिहाय यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या करण्यात येतात. मात्र सेजगाव येथील तलाठ्याने प्रारुप मतदार याद्या तयार करताना एका प्रभागातील सुमारे १०० जवळपास मतदारांना दुसऱ्या प्रभागात तर दुसऱ्या प्रभागातील अनेक मतदारांना तिसऱ्या प्रभागात दाखल केले.



परिणामी तलाठ्याने प्रभाग रचनेची वाट लावली. हा प्रकार प्रारुप यादी प्रसिध्द झाल्यानंतर उघडकीस आल्याने गावात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला घेवून सरपंच के.के.पारधी, उपसरपंच स्वप्नील महाजन, माजी पं.स.उपसभापती डॉ.किशोर पारधी, गौरीशंकर पारधी यासह अनेकांनी यादीवर आक्षेप घेत आक्षेप नोंदविणार असल्याचे सांगितले. तसेच गैर प्रकार करणाऱ्या तलाठ्यावर प्रशासनाने कारवाई करावी, अशीही मागणी केली आहे.

# विकासासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : सभापती टेंभरे

## कोजागिरी निमित्त गुणवंतांचा केला सत्कार

**गोंदिया :** समाजात विविध घटकांचा वास असतो. त्यातच शेतकरी व इतर वर्गाच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न झाल्यास त्याचे चांगले परिणाम समोर येतात. शिवाय समाजाच्या प्रगतीसाठी संघटन शक्ती आवश्यक आहे. अशा सर्व बाबींचा विचार केल्यास विकासासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे मत जि.प.सभापती संजयसिंह टेंभरे यांनी व्यक्त केले. ते स्थानिक पोवार सांस्कृतिक भवनात आयोजित कोजागिरी पौर्णिमा उत्सवानिमित्त कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते.




स्थानिक पोवार सांस्कृतिक भवन येथे पवार प्रगतीशील मंच तथा नवयुवक समितीच्या वतीने कोजागिरी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलतांना टेंभरे यांनी शेतकरी आज व उद्याचा यावर प्रकाश टाकले. तसेच समाजातील मोठा वर्ग हा शेतीशी निगडीत आहे, तेव्हा या वर्गाचेही सन्मान व्हावे, असे सांगत समाजाच्या प्रगतीसाठी आपण प्रयत्नशील राहणार, असेही आश्वासन त्यांनी दिली.

आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून संजयसिंह टेंभरे, पंवार प्रगतीशील मंचचे अध्यक्ष ॲड. पृथ्वीराज चव्हाण, पंवार प्रगतीशील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश भक्तवर्ती, गोंदिया पं.स.सभापती मुनेश रहांगडाले, तिरोडा पं.स.सभापती कुंताताई पटले, देवरी पं.स. उपसभापती अनिल बिसेन, नवयुवक समितीचे अध्यक्ष योगी येडे, महिला समितीचे अध्यक्ष मनिषा गौतम उपस्थित होते.

आयोजित कार्यक्रमात समाजातील पीएचडी धारक तसेच नीट, एमएचसीईटी, गेट यासह शैक्षणिक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे पार्श्वभूमि ॲड. चव्हाण यांनी मांडली. तर कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रिती गौतम तर आभार उपाध्यक्ष पन्नालाल ठाकरे यांनी मानले.

# १४१६ वाहनचालकांकडून ८४ लाखांचा दंड वसूल

## उपप्रादेशिक परिवहन विभागाची कारवाई : २४ कोटी ६६ लाखांचा महसूल गोळा

**वाहनचालकांना शिस्त लावून वाहतूक नियमांचे पालन करावे, अपघातांना आळा बसावा यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या माध्यमातून धडक मोहीम राबविली जात आहे. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करुन अपघात टाळण्यास सहकार्य करावे.**

**राजवर्धन करपे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी**

**गोंदिया:** वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या जिल्ह्यातील १४१६ वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाने दंडात्मक कारवाई करुन ८४ लाख १० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच वर्षभर विविध मोहीम राबवून वाहनचालकांना शिस्त लावण्याचे काम केले जाते.




गोंदिया उपप्रादेशिक परिवहन विभागाने चालू आर्थिक वर्षातील सहा महिन्यात शासनाच्या तिजोरीत २४ कोटी ६६ लाख रुपयांचा महसूल जमा केला आहे. वाहन कर, पर्यावरण कर, आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क, दंडवसुली व कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या विविध वाहन लायसन्स संबंधित शुल्काचा यात समावेश आहे. मागील सहा महिन्यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात ४८७१ दुचाकी वाहने, ६५३० चारचाकी वाहनांची नोंदणी झाली आहे. तर ५२२४ शिकाऊ लायसन्स व ७७९७ स्थायी लायसन्स वितरित करण्यात आले. तसेच कार्यालयाच्या वायुवेग पथकाच्या माध्यमातून १४१६ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन त्यातून ८४ लाख १० हजारांचा दंड वसूल करण्यात आला. गोंदिया सारख्या अविकसीत जिल्ह्यात व अपुऱ्या मनुष्य बळावर उपप्रादेशिक परिवहन विभागाने धडक मोहीम राबवित शासनाच्या तिजोरीत २४ कोटी ६६ रुपयांचा महसूल जमा केला आहे.

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी आयटीआय मध्ये अभ्यासक्रम

गोंदिया- औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोंदिया येथे अल्पसंख्यांक समुदायातील बौद्ध, शिख, ख्रिश्चन, मुस्लीम, पारसी, जैन या उमेदवारांकरीता अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहे. सदर अभ्यासक्रम विनामुल्य आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय किमान १८ वर्ष असावे. शैक्षणिक आर्हता कमीत कमी १० वी पास नापास असावे.

प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देण्यात येईल सदर प्रमाणपत्राच्या आधारे रोजगार व स्वयंरोजगार करता येईल. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सेल्फ एम्प्लॉईड टेलर, डोमेस्टीक डाटा एंट्री ऑपरेटर, असिस्टंट मॅन्युअल मेटल वेल्डिंग व फोर व्हीलर सर्व्हिस असिस्टंट अभ्यासक्रमात करिअर करण्याची संधी आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी वरिल अभ्यासक्रमासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फुलचुर पेठ, गोरेगाव रोड, गोंदिया येथे संपर्क साधावा.

प्रत्येक तुकडीत मध्ये जास्तीत जास्त ३० उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.अल्पसंख्याक समाजातील जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोंदिया यांचेकडुन करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी जी.एन. बनकर यांचेशी संपर्क साधवा.

# डेंग्यू व मलेरीया नियंत्रणासाठी विशेष सर्वेक्षण मोहिम



गोंदिया- जिल्हयात डेंग्यू, हिवताप रुग्ण संख्येमध्ये होणारी वाढ लक्षात घेता संपूर्ण जिल्हयात १७ ते २१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत डेंग्यू, हिवताप व ईतर किटकजन्य आजारा विषयी जनजागृति होण्याच्या दृष्टीने विशेष सर्वेक्षण मोहिमेचे आयोजन करण्यात आल आहे. अशी माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सदर मोहिमेमध्ये आरोग्य कर्मचारी,आरोग्य सेविका, आशा कार्यकर्ती घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार आहेत. सदर मोहिमेमध्ये १७ ते १६ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण कंटेनर सर्वे, ताप सर्वे, गृहभेटीदरम्यान कंटेनर सर्वेक्षण करुण दूषीत कटेनर मध्ये अळीनाशक टेमीफास टाकने तसेच दूषीत कंटेनर घरमालकांना दाखवून रिकामे करण्याचे काम या मोहिमेमध्ये केले जाणार आहे. २० ऑक्टोबर रोजी संपूर्ण जिल्हयात सामूहिक कोरडा दिवस पाळला जाणार आहे. तसेच २१ ऑक्टोबर रोजी डासोत्पत्ती स्थानामध्ये सामूहिक गप्पी मासे सोडण्याची कार्यवाही आरोग्य कमर्चाऱ्याकडून केली जाणार आहे.

कोणताही ताप हिवताप असू शकतो व लवकर निदान तात्काळ उपचार या उक्ती प्रमाणे ताप आलेल्या रुग्णाचे हिवतापाकरीता रक्त नमूणे घेऊन तात्काळ निदान आरडीके किट दवारे केले जाणार आहे. डेंग्यू, हिवताप आजारापासून बचाव करण्याकरीता आठवडयातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा म्हणजे घरातील पाण्याची सर्व भाडी घासून पूसून कोरडे करुण ठेवायचे ड्रम, कूलर पाण्याच्या टाक्या, रांजन, माठ, फूलदान्यातील साचलेले पाणी रीकामे पडलेले टायर नारळाच्या करवंटया यासारख्या टाकावू वस्तूमध्ये पाणी साचू दयायचे नाही जेणेकरुण डासांची उत्पत्ती होणार नाही.

झोपतांना नियमित मच्छरदानीचा वापर करावा, शौचालयाच्या व्हेंट पाईप ला जाळी बांधावी, ताप आल्यास जवळच्या दवाखाण्यात जावून तात्काळ रक्त तपासनी करुण उपचार घ्यावा. कोणताही ताप अंगावर काढू नये व घराबाहेर साचलेल्या पाण्यामध्ये गाडीचे जळालेले इंजीन ऑइल टाकण्याबाबत माहिती दिली. तसेच जनतेच्या सहभागानेच किटकजन्य आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य असल्याचे डॉ चौरागडे म्हणाले. याकरीता आरोग्य विभागाकडूण सूरु असलेल्या डेंग्यू सर्वेक्षण शोध मोहिमेला जनतेनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# ढिवर जातीचे आरक्षण पुर्ववतव लागू करा : प्रा.डॉ.गेडाम



**गोंदिया:** भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील ढिवर जातीला सन १९५० पूर्वी असलेले अनुसूचित जातीचे आरक्षण पुर्वपुवतव लागू करा अशी मागणी अखिल ढिवर समाज विकास समिती, भंडारा व गोंदिया यांचे वतीने महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाला करण्यात आल.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष ज. मो. अभ्यंकर व त्यांची चमू १४ ऑक्टोबरला गोंदिया जिल्हा दौऱ्यावर असतांना अखिल ढिवर समाज विकास समिती सदस्य प्रा. डॉ. दिशा गेडाम यांच्या नेतृत्वाखाली ढिवरसमाजातील अनेक कार्यकर्ते नागरिकानी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले. या प्रसंगी समिती सदस्य आर.डी.शिंदे, के.आर.मेंढे, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, समाज कल्याचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे प्रामुख्याने उपस्थित होते.

निवेदन देतांना समितिचे माणिक गेडाम,परेश दुरुगवार,मनीराम मौजे, मनोज मेश्राम, लीलाधर भुरे, उमराव मांढरे, बृजलाल मौजे, नंदकिशोर उके, जयेंद्र बागडे, ऋषी गेडाम, नीता नागपुरे, मीरा गेडाम, रागिनी वलथरे, श्रावण वलथरे, रंजना कांबळे,कोमेश कांबळे, मधुकर नगरे, मनोहर मौजे, के. डी. बर्वे तसेच आदेश गणवीर, अतुत सतदेवे आदी उपस्थित होते.

# गोदामातून दीड कोटींचा धान गायब

## सालेकसा सोसायटीतील १५ जणांवर गुन्हा दाखल



**गोंदिया :** सालेकसा तालुक्यातील समृद्ध किसान शेती उद्योग साधन सामग्री पुरवठा व खरेदी विक्री सेवा सहकारी संस्था मर्यादीत सालेकसा नोंदणी क्रंमाक १०७० च्या अध्यक्ष, सचिवा सह १५ संचालक मंडळावर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पणन अधिकारी मनोज बाजपेयी (४९) यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला.

समृद्ध किसान संस्था सालेकसा या संस्थेने पणन महासंघा सोबत केलेल्या करारनाम्या प्रमाणे व शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत करण्यात येणाऱ्या नियम व अटीच्या अधिन राहून धान खरेदी करायची होती. पणन हंगाम २०२१-२२ मध्ये या संस्थेने शेतकऱ्यांचे धान खरेदी केल्यानंतर त्याची साठवणूक करण्याची पूर्ण जबाबदारी येते. खरेदी केलेला धान पणन महासंघाच्या देण्यात आलेल्या डिओप्रमाणे भरडाई करण्याकरीता मिलधारकांना धानाची उचल देणे बंधनकारक आहे. परंतु दिलेल्या डिओप्रमाणे समृद्ध किसान संस्था, सालेकसा यांनी मिलर्सना धान उचल दिला नाही. डिओ दिलेले मिलर्स यांनी धान उचल देत नसल्याबाबत जिल्हा पणन अधिकारी, गोंदिया यांचेकडे लेखी तक्रार दिल्या आहेत. समृद्ध किसान संस्थेस वेळोवेळी धान उचल देण्याकरीता नोटीस देण्यात आल्या. मात्र, संस्थेकडून नोटीसचे उत्तर देण्यात आले नाही व धान उचलही देण्यात आलेले नाही. यामुळे संस्थेच्या गोदामांमध्ये धान साठ्याची पाहणी करण्याकरीता १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ दरम्यान मार्केटींग अधिकारी मनोज बाजपाई, सहायक निबंधक, सालेकसा, श्रेणी- १ संजय गायधने, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी धनंजय यशवंत देशमुख, ज्ञानदेव तनपुरे, हरीष चेटुले पाहणी करण्यास गेले.यावेळी समृद्ध किसान संस्थेने भाड्याने घेतलेल्या साकरीटोला येथील उर्मिला दोनोडे यांच्या मालकीचे गोदाम व रोंढा येथील अनिल अग्रवाल यांच्या मालकीच्या गोदामातून तब्बल ८००० क्विंटल धान गायब होते. त्या धानाची किंमत १ कोटी ५५ लाख २० हजार रुपये सांगितले जाते.

**हंगाम २०२१-२२ मधील धानाची केली अफरातफर**

महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड सोबत समृद्ध किसान संस्था सालेकसा या संस्थेने पणन महासंघा सोबत केलेल्या करारनाम्या प्रमाणे व शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत करण्यात येणाऱ्या नियम व अटीच्या अधिन राहुन धान खरेदीचे कार्य करायचे होते. परंतु तसे न करता पणन हंगाम २०२१-२२ मध्ये सदर संस्थेने शेतकऱ्यांचे धान खरेदी केल्यानंतर त्याची साठवणूक करण्याची पूर्ण जबाबदारी येते. व खरेदी केलेला धान पणन महासंघाच्या देण्यात आलेल्या डिओप्रमाणे भरडाई करण्याकरीता मिल धारकांनी धानाची उचल देणे बंधनकारक असतांना डिओप्रमाणे धान समृद्ध किसान संस्था, सालेकसा यांनी मिलर्सना दिलेच नाही.

संस्थेचे अध्यक्ष वासुदेव महादेव चुटे रा. आमगाव खुर्द, सालेकसा, भोजलाल अंतुलाल बघेले, राघोंशी, घनश्याम बहेकार रा. ईसनाटोला, रोशन-लाल वसंतराव राणे रा.लोहारा, प्रेमलाल तुरकर, घनश्याम नागपुरे रा.मुंडीपार, राजेंद्र बहेकार रा. बोदलबोडी, खेमराज उपराडे रा.मुंडीपार, दुलीचंद मोहारे रा.गोवारीटोला, ग्यानीराम नोणारे रा. भजेपार, उमेश लहु वलथरे, मु.पो. गिरोला, वंदना अंबादे, रा.आमगाव खुर्द, लिला धुर्वे, जमाकुडो, व्यवस्थापक जगदीश खोब्रागडे, रा.सालेकसा, ग्रेडर अजय भरत फुंडे, रा. आमगाव खुर्द यांच्या वर गुन्हा दाखल केला आहे.

# धान खरेदी केंद्रावर वयोवृद्ध व आजारी शेतकऱ्यांना सवलत द्या



**तुमसर:** भंडारा व गोंदिया जिल्ह्यात शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावरील नोंदणीच्या अटीत शिथिलता देऊन वयोवृद्ध व आजारी शेतकऱ्यांसाठी त्यांचे घरी जाऊन नोंदणीची व्यवस्था करावी,धान खरेदी केंद्रावरील गर्दी कमी करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर नोंदणीची व्यवस्था करावी या मागणीसाठी किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार शिशुपाल पटले यांनी मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे यांची भेट घेतली. शासकीय आधारभूत किंमतीवर खरेदी करण्यासाठी अनेक शासकीय धान खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. मात्र, या धान खरेदी केंद्रांवर शेतकरी, महिला व वयोवृद्ध शेतकऱ्यांसाठी सुविधा नसल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन फोटो काढण्याची अट शिथिल करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत आणि जे शेतकरी आजारणामुळे खरेदी केंद्रावर पोहचू शकत नाही अशा शेतकऱ्यांना त्यांचे घरी जाऊन नोंदणीची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी जिल्हाधिकारी भंडारा यांना पत्र पाठवून केली आहे.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात अनेक धान खरेदी संस्था डिफॉल्ट झाल्यामुळे मोजक्याच धान खरेदी केंद्रांना नोंदणीसाठी जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेली आहे.

खरेदी संस्थाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना दिवसभर केंद्रावर रांगेत उभे राहावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांना मन:स्ताप सहन करावा लागतो. अनेक शेतकरी वयोवृद्ध व आजारपणामुळे खरेदी केंद्रावर पोहचू शकत नाही, असे शेतकरी धान विक्री पासून वंचित राहू नये म्हणून त्यांचे घरी जाऊन नोंदणीची व्यवस्था करण्यात यावी. तसेच धान खरेदी केंद्रावरील गदी कमी करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर नोंदणीची व्यवस्था करावी, अशी मागणी माजी खासदार शिशुपाल पटले यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिवांकडे केली आहे.

# महाज्योती संस्थेचा खेळ,चार दिवसाआधी स्थगिती,चार दिवसातच परवानगी!

**पुण्याच्या ज्ञानदिप अकादमीसाठी महाज्योती आग्रही का? प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा प्रश्न**

**गोंदिया:-** महात्मा ज्योतीबा फुले संशोधन प्रशिक्षण संस्थेने (महाज्योती) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभ्यासक्रमात बदल झाल्यानंतरही प्रशिक्षण केंद्रासाठी नविन निविदा प्रकिया न राबविता विना निविदा जवळपास १५ करोड रुपयांचा कंत्राट एकाच संस्थेला देणे योग्य नाही. व्यवस्थापकीय संचालक स्तरावर इतका मोठा निर्णय होऊ शकत नाही. त्यातच सत्तातंरानंतर झालेल्या महाज्योतीच्या बैठकीतही हा विषय चर्चेला आलेला नव्हता. त्यामुळे हा निर्णय कुणी घेतला याची सखोल चौकशीच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी केली पाहिजी अशी मागणी ओबीसी संघटनांसह विद्यार्थ्यांनी केली आहे.

स्थगीती उठविल्याचे महाज्योतीने काढलेले हेच ते पत्र


एमपीएससी प्रशिक्षणासाठी महाज्योतीने ऑंक्टोंबरला पत्र काढत विद्यार्थ्यांना एमपीएस-सी प्रशिक्षणासाठी ज्ञानदीप अकादमी पुणे येथे कागदपत्रांची तपासणीकरीता सूचना दिल्या होत्या. मात्र त्यानंतर अवघ्या ४ दिवसातच १० ऑंक्टोंबरला कुठल्याही आधाराविना परत पत्र काढत ज्ञानदिप अकादमीमध्ये कागदपत्र जमा करण्यास स्थगिती दिली होती. आता त्या स्थगितीला पुन्हा ४ दिवस लोटत नाही तोच व्यवस्थापीय संचालकांने पुन्हा त्याच संस्थेची निवड करीत कागदपत्रासांठी प्रशिक्षणाथी विद्यार्थ्यांना सूचना देण्यात आल्याने महाज्योतीमधील हा गोंधळ चर्चेचा विषय झालेला आहे.

आधीच अभ्यासक्रमात बदल झालेला असताना नवीन अभ्यासक्रमाच्यादृष्टीने व निविदा आमंत्रित करुन प्रशिक्षण संस्थाची निवड करणे गरजेचे होते. मात्र ती प्रकिया न राबवता ज्ञानदिप अकादमीची निवड करुन विद्यार्थ्यांना कळविण्यात आले. मग असे काय घडले की त्या संस्थेतील प्रकिया थांबवण्यात आली. आणि त्यानंतर पुन्हा चार दिवसानी त्याच संस्थेच २७ ऑंक्टोंबर पर्यंत कागदपत्राची पडताळणी करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व प्रकारावरुन महाज्योतीमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याऐवजी इतर गोष्टीकंडे लक्ष तर दिले जात नाही ना अशी शंका निर्माण झाली आहे. त्यातच राज्याचे ओबीसी मंत्र्याकडे महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालकाबद्दल राज्यातील संघटनाचे तक्रारीचे पत्र असताना त्यांची पाठराखण कुठल्या आधारावर केली जात आहे हा सुध्दा प्रश्न या माध्यमातून समोर आलेला आहे.

एमपीएससीकरीता इतरपणनावाजलेल्या संस्था असतांना व ज्ञानदिपला आधीच स्थगिती दिल्यानंतर परत ज्ञानदीपलाच प्रशिक्षणाचे कंत्राट देण्यामागे हेतू प्रशासनाचा योग्य दिसून येत नाही. यामुळे होतकरु विद्यार्थ्यांना चुकीचा प्रशिक्षण केंद्रात पाठवून खच्चीकरण करण्याचे काम महाज्योतीचे व्यवस्थापिकय संचालक मंडळ करीत आहे. मुख्यमंत्र्यांनी याकडे लक्ष देत त्वरीत एमपीएससीचा अभ्यासक्रम बदलेला असल्याने विद्यार्थ्यांना संस्था निवडीची संधी द्यावी आणि १५०० विद्यार्थ्यांसाठी एकच प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात येऊ नये, यामुळे प्रशिक्षणाचा दर्जा खालावण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर चांगल्या संस्थाचे पर्याय उपलब्ध करुन देण्यात यावे अशी प्रतिक्रिया कश्यप ईश्वरकर प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्याने दिली आहे.

युपीएससीच्या धर्तीवर एमपीएससी २०२३ पासून परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे महाज्योतीने ज्ञानदीप या एकाच संस्थेवर अवलंबून न राहता इतर तीन पर्याय तरी उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन विद्यार्थी संस्थेच्या दर्जेप्रमाणे कोणत्याही एका संस्थेत प्रवेश घेतील व दर्जेदार प्रशिक्षण घेतील असे सारंग मौदेकर या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्याचे म्हणने आहे.

# ९७ आधारभूत केंद्रावरुन खरेदी करणार धान



**गोंदिया:** खरीप हंगामातील शासकीय धान खरेदीला जिल्ह्यातील ९७ धान खरेदी केंद्रावरून शुक्रवारपासून (ता.१४) सुरुवात झाली आहे. यासाठीचे नियोजन जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने केले असून यासंबंधीच्या सूचना सर्व धान खरेदी करणाऱ्या सहकारी संस्थांना केल्या आहेत.

जिल्ह्यात खरीप हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनकडून शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून हमीभावाने धान खरेदी केली जात आहे. खरीप हंगामातील हलक्या धानाची कापणी आणि मळणी सुरू आहे. शेतकरी हलक्या धानाची दिवाळीपूर्वी विक्री करून दिवाळ सण साजरा करतात. सध्या हलके धान बाजारपेठेत विक्रीस येण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने ९७ धान खरेदी केंद्रावरून धान खरेदी करण्याचे नियोजन केले आहे.

शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २०२२-२३ मधील धान खरेदीकरिता एनईएमएल पोर्टलवर ऑनलाईन नोंदणीसाठी जिल्ह्यातील सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी तालुक्यातील जवळच्या आधारभूत धान खरेदी केंद्रावर स्वत:चे प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करून चालू हंगामाचे सातबारा उतारा, आधार कार्ड, बैंक पासबुक व मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे सादर करुन २१ ऑक्टोबरपर्यंत खरीप हंगामातील धान खरेदी करिता ऑनलाईन नोंदी करायची आहे. या शिवाय शेतकऱ्यांना शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करता येणार नाही. कोणत्याही शेतकऱ्यांनी जनधन योजनेचे खाते, संयुक्त बैंक खाते नोंदणी करताना देऊ नये असे जिल्हा मार्केटिंग फेडरेशन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी कळविले आहे.

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा गोंदिया जिल्हा दौरा

**गोंदिया :** राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील बुधवार १९ ऑक्टोबर २०२२ रोजी गोंदिया जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे कार्यक्रम पुढील प्रमाणे आहेत.

बुधवार १९ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता बिरसी विमानतळ गोंदिया येथे आगमन व मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण व राखीव. ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे विविध विषयांवर आढावा बैठक. दुपारी १२.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे भाजप पदाधिकारी यांचे समवेत चर्चा व राखीव. दुपारी ०२.१० वाजता शासकीय विश्राम गृह येथून आसोली ता. गोंदिया येथे पशुवैद्यकीय दवाखाना नवीन इमारतीचे भूमिपूजन कार्यक्रमास उपस्थिती. ०३.१५ वाजता रावणवाडी ता. गोंदिया येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत उद्घाटन व ग्राम सचिवालयाचे भूमिपूजन. सायंकाळी ०४ वाजता स्थायी भूमी पट्टे वाटप कार्यक्रमास उपस्थिती. ०५.३० वाजता श्रीकृष्ण गौरक्षण सभा संचलित गौशाळांना भेट.



# अतिक्रमण रहदारीला बाधक



**गोंदिया:** शहरातील सर्वच लहान मोठ्या मार्गावर अतिक्रमणाचे प्रस्थ वाढले आहे. येथील गांधी प्रतिमा चौक ते रेल्वेस्थानक त्याचबरोबर गांधी चौक ते चांदणी चौक व गोरेलाल चौक ते दुर्गा चौकापर्यंतच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात दुतर्फा दुकानदार, व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केले आहे. परिणामी येथे वारंवार रहदारीत अडथडा निर्माण होऊन वाहतूक कोडींचा सामना वाहनचालकांना करावा लागतो. याकडे संबंधित प्रशासनाने लक्ष देऊन तात्काळ अतिक्रमण निर्मूलन करा, अशी मागणी गोंदियाकरांनी केली आहे.

गोंदिया शहर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी विविध साहित्य खरेदीसाठी आणि विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होते. शहरातील मुख्य व इतर रस्त्यांवर दोन्ही बाजूला व्यापाऱ्यांनी व किरकोळ दुकानदारांनी अतिक्रमण करुन त्यांच्या दुकानाचा विस्तार केला आहे. त्यामुळे शहरातील मार्ग अरूंद झाले आहे. विशेष म्हणजे, सद्या सणासुदीचे दिवस असल्यामुळे शहरात खरेदी करणाऱ्यांची चांगलीच वर्दळ वाढली आहे. अशावेळी व्यापारी व दुकानदारांनी थेट पादचारी रस्त्यावर अतिक्रमण केले असल्याने दरदिवशी शहरात वाहतुकीची कोंडी होत असते. विशेषत: खरेदी करण्यासाठी येणारे ग्राहक आपली वाहने दुकानांसमोरच उभी करत असल्याने त्यात आणखी भर पडत आहे.

**मार्ग मोकळा करण्याची मागणी**

गांधी प्रतिमा ते गोरेलाल चौक ते श्री टॉकीज चौक या मार्गावर मुख्य बाजारपेठ असताना रेल्वेस्थानकाकडे जाण्यासाठी हाच महत्वाचा मार्ग आहे. त्यामुळे येथे वाहन व नागरिकांची प्रचंड वर्दळ असते. व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणामुळे येथे वाहतुकीस अडथडा निर्माण होतो. त्यामुळे अनेकदा वाहतूक कोंडी होते. महत्वाचे म्हणजे, या रस्त्यांवर अनेकदा किरकोळ अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत. त्याकरिता संबंधित विभागाने सदर मार्गावरील अतिक्रमण काढून मार्ग मोकळा करण्याची मागणी येथील नागरिकांची आहे.

# जिल्ह्यात सुरू असलेली अवैध जड वाहतूक बंद करा



**गोंदिया:** जिल्ह्यामध्ये मागील अनेक महिन्यापासून जागोजागी रस्त्याचे काम सुरू आहे. गोंदिया शहरात तर भूयारी गटारी योजनेचे कामसुद्धा सुरू आहे. तसेच या अंतर्गत रस्ते आणि नाली बांधकाम चालू असल्यामुळे यावर्षी मागील चार महिन्यांपासून सतत पाऊस पडत असल्यामुळे गोंदिया शहर तसेच जिल्हातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्यात जड वाहतुकीने परिस्थिती आणखीच गंभीर झाली असून, जडवाहतुकीवर आळा घालावा, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

सर्वसामान्य जनतेची तक्रारी लक्षात घेता जिल्ह्यात सर्वत्र जड वाहतूक दिवस रात्रं सुरू आहे. त्यामुळे नागरिकाना येणे जाने करण्याकरीता खूपच त्रास सहन करावा लागत आहे. शासनानी ठरवून दिलेल्या नियमानुसार क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक करणे कायदेशिररित्या गुन्हा आहे. उपरोक्त कारणामुळे जिल्ह्यात दिवसेदिवस रस्त्यामुळे होत असलेले दुर्घटना वाढलेले आहेत. जिल्ह्यात होत असलेले अवैध वाहतुक आणि प्रवासी वाहतुक ताबडतोड थांबवावी. अन्यथा, काँग्रेस पक्षातर्फे दिवाळी नंतर तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि निर्माण होणाऱ्या परिस्थितीला परिवहन विभाग जवाबदार राहिल, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देताना गोंदिया जिल्हा काँग्रेस कमेटी ओबीसी विभागाचे अध्यक्ष जितेंद्र कटरे, गोंदिया शहर काँग्रेस अध्यक्ष जहीर अहमद, ग्रामीण काँग्रेस तालुकाध्यक्ष सूर्यप्रकाश भगत, ओबीसी जिल्हा महासचिव जीवनलाल शरणागत, ओबीसी जिल्हा सचिव अजय रहांगडाले, अध्यक्ष तुमखेडा बु. घनश्याम पटले, राजेंद्र तुरकर, ओमप्रकाश मचाडे, योगेश पारधी, साहिबलाल बिसेन, नीरज पटले, सागर वघेला, अनुज रहांगडाले, दिवेश रवींद्र सतीसेवक, अर्पित बंसोडे आदी कार्यकर्ता उपस्थित होते.

# अटकेनंतर स्वत:चे अधिकार तुम्हाला ठाऊक आहेत का?

## आपले अधिकार जाणून घ्या, ४८ तासांच्या आत वैद्यकीय चाचणी व्हावी

**गोंदिया:** कोणत्याही गुन्ह्यात एखाद्याला पहिल्यांदाच अटक झाली तर काय करायचे, याची अनेकांना माहितीच राहत नाही. त्यामुळे अनेकजण समाजातील भीतीने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. त्यामुळे सर्वसामान्यांना अटक झाल्यानंतर त्यांचे अधिकार काय आहेत हे समजणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अटक झालेल्या व्यक्तींचे हक्क काय आहेत. याची मार्गदर्शक तत्वे स्पष्ट केली आहेत. अटक झालेल्या व्यक्तींना ४८ तासांच्या आत प्रशिक्षीत वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत वैद्यकीय चाचणी केली पाहिजे. हा वैद्यकीय अधिकारी राज्याच्या आरोग्य संचालनायाकडून प्रमाणित करण्यात आलेला असावा. आरोग्य संचालनालयाने प्रत्येक जिल्हा व तालुक्यामध्ये असे प्रमाणित केलेले वैद्यकीय अधिकारी कोण आहेत? याची यादी जाहीर करावी,

### प्रत्येक पोलीस ठाण्यात असावे अधिकाराचे फलक



**❒आरोपीला अटक झाल्यानंतर त्याला कोणते अधिकार आहेत. याची सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेले नियम त्या पोलीस ठाण्याच्या डायरीजवळच लावून ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्या आरोपीला ते वाचता येतील.**

**❒डी.के.बसूच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अटक होणाऱ्या व्यक्ती हक्काच्या संदर्भात काही नियम घालून दिले आहेत. त्यानुसार आरोपीला त्याचे अधिकार माहिती असावे.**

**गोंदिया जिल्ह्यात १६ पोलीस ठाणे आहेत. व संपूर्ण पोलीस ठाण्यात आरोपीचे अधिकार असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत मोठ्या बोर्डावर लावून ठेवलेली आहेत.**

अटकेके आदेशासहीत वरील दस्ताऐवजाच्या प्रती स्थानिक न्यायदंडाधिकाऱ्यांकडे ताबडतोब पाठविण्यात याव्यात, आरोपींची तपासणी चालू असताना त्या दरम्यान आरोपींना त्यांच्या वकीलाला भेटण्याचा पूर्ण अधिकार आहे. राज्य आणि जिल्हा स्तरावरील पोलीस मुख्याख्लयात असणाऱ्या पोलीस नियंत्रण कक्षामध्ये अटक करणाऱ्या पोलीस अधिनियमाने ८ ते १२ तासांच्या आत अटक केलेल्या व्यक्तीचे नाव व इतर तपशील ताबडतोब पाठविला पाहिजे. हा तपशील सर्वांना दिसेल, असा ठिकाणी सुचनाफलकांवर लिहायला हवा. नियमाचे पालन न झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाल्याचे गृहीत धरुन कार्यवाही करण्यात येते. यासाठी पोलिसांना आरोपींचे हक्क त्यांना द्यावेच लागते.

### काय आहेत तुमचे अधिकार?

**❒अटक करणाऱ्याचे नाव व दर्जा स्पष्टपणे दिसावा. पोलीस अधिकाऱ्याने अटक करताना व चौकशी करताना त्याचे नाव व दर्जा दाखवणारा बॅच स्पष्टपणे व अचूकपणे दिसेल, असा लावावा. अटक झालेल्या व्यक्तींची तपासणी करणाऱ्या सर्व पोलीसांची नोंद नोंदवहीत असावी.**

**❒अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने अखक होणाऱ्या व्यक्तीच्या नावे स्पष्ट लेखी आदेश अटक करतेवेळी न्यायला हवा. आदेशात किमान एक साक्षीदाराची जो त्या व्यक्तीचा नातेवाईक किंवा त्या भागातील माननीय व्यक्ती असेल त्याची सही घेतली पाहिजे. या आदेशावर अटक होणाऱ्या व्यक्तीने त्या दिवसाची तारीख व अटकेची वेळ टाकून सही केली पाहिजे.**

**❒अटक झालेली व्यक्ती, कोठडीत डांबून ठेवलेली व्यक्ती, चौकशी केंद्रात किंवा पोलीस लॉकअपमध्ये असलेल्या व्यक्तींचा किमान एक मित्र, नातेवाईक किंवा अशी व्यक्ती जी अटक झालेल्या व्यक्तीस ओळखते व तिच्या कल्याणाची अपेक्षा बाळगते. अशा व्यक्तीस अटक झालेल्या व्यक्तीचा ठावठिकाणा ताबडतोब कळविला गेला पाहिजे. अटकेच्या आदेशावर सही करणारा साक्षीदार मित्र किंवा कुटुंबिय असेल तर हे आवश्यक नाही.**

**❒जर अटक झालेल्या एखाद्या व्यक्तींचे नातेवाईक किंवा मित्र मंडळी शहराच्या किंवा जिल्ह्याच्या बाहेर राहत असतील तर जिल्ह्यातील कायदेविषयक मदत करणाऱ्या संघटना आणि संबंधित पोलीस ठाणे यांना त्या व्यक्तींच्या अटकेकी वेळ, ठिकाण आणि कोठडीची जागा हे ८ ते १२ तासांच्या आत तारेने किंवा दुरध्वनीने कळविले पाहिजे.**

**❒अटक झालेल्या व्यक्तीला अटक झाली हे त्या-त्या संबंधित मित्र मंडळीस नातेवाईकांना ताबडतोब कळविण्याचा हक्क आहे हे पोलीस अधिकाऱ्याचे सांगितले पाहिजे.**

# शाळेच्या रस्त्यावर अतिक्रमण; आसोली येथील प्रकार



**सदर गट हा शासकीय असुन या गटावर गावातील अनेकांनी अतिक्रमण केले आहे. अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनातर्फे प्रक्रिया सुरू आहे.**

**श्री बिसेन ग्रामविकास अधिकारी ग्रा. प. आसोली**

**गोंदिया:-** शालेय विद्यार्थ्यांच्या शाळेत येण्याजण्याच्या रस्त्यावर गावातील व्यक्तींनी अतिक्रमण केल्याने शाळेत येण्याजण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. सदर धक्कादायक प्रकार तालुक्यातील आसोली येथे उघडकीस आला असून सदर अतिक्रमण तात्काळ हटविण्याची मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते मुकेश बन्सोड यांनी प्रशासनाकडे केली आहे.

येथे प्रसिद्ध श्री सुदामा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसे मुक्त जीवन कॉन्व्हेंट असून येथे परिसरातील नवरगाव(कला),मुंडीपार (खुर्द), इर्री, मोरवाही, बटाना, नवरगाव (खुर्द), चुलोद व आसोली येथील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यांच्या शाळेत येण्याजण्याच्या रस्त्यावरच गावातील व्यक्तींनी अतिक्रमण केल्याने रस्ता अपुरा झाला आहे. तसेच पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने पाण्यातूनच शालेय विद्यार्थ्यांना वाट काढावी लागत असते. या संबधात गावकऱ्यांनी अनेकदा सदर अतिक्रमण हटविण्यासाठी ग्राम पंचायत ला कळविले परंतु ग्राम पंचायत प्रशासन यावर कोणतीही कारवाही करीत नाहीत त्यामुळे सदर अतिक्रमण धारकासोबत ग्रामपंचायत प्रशासनाचे काही आर्थिक हितसंबंध तर नाही? असा आरोपही गावकऱ्यांनी लावला आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता सदर अतिक्रमण तात्काळ हटवून विद्यार्थ्यांसाठी रस्ता मोकळा करण्यात यावा अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते मुकेश बन्सोड यांनी केली आहे.